स्नेहबंध

दिवाळी विशेषांक

ऑक्टोबर २०१९

महाराष्ट्र मंडळ डेट्रॉईट

एकमेका सहाय्य करु, अवघे धरु सुपंथ

"आपले मंडळ"

Maharashtra Mandal of Detroit

With Best Compliments from

Sachin and Anuja Lawande

स्नेहबंध

अनुक्रमणिका

			Page No.
1	संपादकीय	भारती मेहेंदळे	5
2	Committee Spotlight	भारती मेहेंदळे	8
3	सांग दर्पणा कशी मी दिसते	शमा सुखटणकर	11
4	अमेरिका की इंडिया	निरंजन हुंबड	14
5	दीपदान	सिद्धार्थ शास्त्री	16
6	किल्ला दिवाळीचा	शीतल सोनार	21
7	अमेरिकेतून भारतीय उत्सवाकडे पाहताना	कृष्णग सचिन पाटील	24
8	२० व्या शतकातली भूतान यात्रा	बाळकृष्ण पाडळकर	26
9	शब्दशोध	संजय मेहेंदळे	29
10	प्रश्न --	पूनम तोरगल	32
11	शब्दकोडं	संजय मेहेंदळे	34
12	पुष्करचा संभ्रम आणि नवी सुरुवात	ऋतूज देशपांडे	37
13	गाठ	सुरेश नायर	41
14	स्वकमाई...	सरोज जावकर	43
15	छंद मराठी बंध मराठी	सायली मोकाटे-जोग	45

संपादक

ज्योत्स्ना दिवाडकर | संजय मेहेंदळे
ऋतूज देशपांडे | सुशांत खोपकर | उमा कानडे

संपादक/सहाय्य

मेधा उमरजी

मुखपृष्ठ रचना व मांडणी

मानसी डहाणूकर

लेखकांना, चित्रकारांना आणि वाचकांना संपूर्ण मतस्वातंत्र्य देण्यात आले देण्यात आले आहे. लेखांतून व चित्रांतून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक किंवा आपण सहमत असूच असे नाही, तेंव्हा आपण हा अंक केवळ "मनोरंजनासाठी" आहे अशी अपेक्षा ठेवून वाचावा, ही विनंती!

The N. Rachmale Foundation

Prosperity Through Service

Avinash and Hema Rachmale

SKY Group Inc.

Sky Group Grand, LLC.
Real Estate Group

Lakeshore Healthcare Group, Inc.
Nursing Home & Managed Care

Lakeshore Global
Infrastructure Contractors

www.therachmalefoundation.org | www.Lgccorp.com

स्नेहबंध

नमस्कार मंडळी,

आपणा सर्वांना दसरा-दिवाळीच्या निमित्ताने

मनःपूर्वक शुभेच्छा!

नवरात्र सुरु झालं की आपल्याला दिवाळीचे वेध लागतात. भारतात तर बाजारपेठ नुसती रंगीबेरंगी आकाशदिव्यानी भरून जाते. माझ्या लहानपणी सहामाही परीक्षा संपली की घरी फराळ बनवायचा... चकल्या, कडबोळी, अनारसे, चिवडा, लाडू, शेव, शंकरपाळी असे सर्व पदार्थ साग्रसंगीत करायचे. फटाके आणायचे... फुलबाज्या, भुईनळे, सुदर्शनचक्र, भुईचक्र, बाण, लवंगी फटाके, चमन चिडी आणि सुतळी बॉम्ब अशी आम्ही यादी करायचो. भेटकार्ड बनवायची, दगड-माती आणून किल्ला बनवायचा, किल्ल्यावर ठेवण्यासाठी मावळे, रांगोळीसाठी रंग, पणत्या.... या सगळ्याची एक वेगळीच मजा असायची!

अमेरिकेत आल्यावर प्रथम इथे मिळणाऱ्या गोष्टीतून फराळाचे जिन्नस बनवायला नव्याने शिकले. आकाश कंदील, पणत्या बनवल्या. मग महाराष्ट्र मंडळात रांगोळीचे गालिचे, फुलांच्या रांगोळ्या, धान्याच्या रांगोळ्या असे विविध प्रकार करायला मिळाले याचा विशेष आनंद वाटतो. आपण जगाच्या पाठीवर कुठेही गेलो, तरी तिथे ज्या गोष्टी उपलब्ध आहेत त्यातून आपली कला साकारायला शिकतो; आणि त्यातून मिळणारा आनंद काही वेगळाच असतो नाही का...?

म्हणता म्हणता मंडळाचा 2019 मधला हा अठरावा आणि शेवटचा कार्यक्रम...! "रसिका तुझ्याचसाठी" या मालिकेचे आपण ३ वेगळे आणि हटके कार्यक्रम सादर केले. स्पोर्ट्सचे २ प्रोग्रॅम्स, मुलांसाठी मुव्ही नाईट, फोर्ड फॅक्टरी टूर आणि "आरोग्यम् धनसंपदा" (Health is wealth) ही नवीन मालिका आपण यावर्षी चालू केली; याच्या अंतर्गत योगाथॉन, डॉ. दीक्षित यांचे "Effortless Weight Loss and diabetes prevention" यावर lecture, ५ K वॉकथॉन इत्यादी कार्यक्रम आयोजित केले होते. त्याला आपण भरभरून प्रतिसाद दिलात; त्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद!

यंदा आपण कोजागिरीला भारतातून श्री.चारुदत्त आफळे यांचा श्रीकृष्ण कीर्तन आणि संगीत नाट्य-छटा असा अत्यंत वेगळा कार्यक्रम केला होता. त्यात मत्स्यगंधा, संगीत स्वरसम्राज्ञी, कान्होपात्रा असे वेगवेगळे भाव असलेले नाट्यप्रवेश सादर केले गेले, ते डेट्रोईटच्या चोखंदळ प्रेक्षकांना खूपच भावले. त्याबरोबरच अनुप बापट आणि शाश्वती किणीकर यांचा संगीत सौभद्र यातील नाट्यप्रवेश आपण सादर केला, तोही प्रेक्षकांची वाहवा मिळवून गेला.

यंदाच्या दिवाळीच्या कार्यक्रमात नाटकवेड्या डेट्रोइटकरांसाठी आपण खास मेजवानी घेऊन येत आहोत; श्री.भरत जाधव यांचे अत्यंत गाजलेले नाटक "पुन्हा सही रे सही"....! याचा सेट उभारण्याचे काम आपले सर्व पडद्यामागील कलाकार अतिशय उत्साहाने करीत आहेत. याशिवाय नेहेमीचे आकर्षण दिवाळी फराळ भारतातून खास मागवला आहे; आणि जेवणाचा मेनू पण अगदी हटके ठरवला आहे. यावर्षी आपण रांगोळी आणि किल्ला करायला सर्वांना आवाहन केले होते. याचे प्रदर्शन हॉलमध्ये असेल, तरी आपण त्याला भेट अवश्य द्या.

स्नेहबंध

आज हे शेवटचे अध्यक्षीय लिहिताना माझ्या मनात मिश्र भावना दाटून आल्या आहेत. गेल्या दिवाळीत मी मंडळाच्या अध्यक्षपदाचा स्वीकार केला तेव्हापासून आपले नेहेमीचे ६ कार्यक्रम आणि त्याशिवाय काहीतरी नवीन आणि विधायक देण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न केला. आपल्या लोकांना उपयुक्त, सांस्कृतिक, मनोरंजनपर, अध्यात्मिक, प्रबोधनपर, आरोग्य-विषयक, शास्त्रीय, volunteering असे विविध कार्यक्रम आपण केले. हे आपल्या सर्वांना आवडले असतील अशी मी आशा करते. खूप लोकांनी मला फोन, ई-मेल, प्रत्यक्ष भेटीत मिठी मारून, शब्दांत जो काही उदंड प्रतिसाद आणि प्रेम दिलंत आणि आपल्या मंडळाच्या लोकांची सेवा करायची संधी मला दिलीत त्याबद्दल मी आपली सर्वांची अत्यंत ऋणी आहे आणि ज्या कार्यकर्त्यांनी मंडळाच्या कामाला अक्षरशः वाहून घेतले, त्यांच्या मदतीशिवाय इतक्या संख्येने कार्यक्रम यशस्वी करणे अशक्य होते त्या सर्वांचे आभार मानण्यास माझे शब्द अपुरे आहेत; त्यामुळे त्यांच्या ऋणात राहणेच मी पसंत करेन आणि अशीच साथ आपण येणाऱ्या नवीन अध्यक्ष आणि कमिटीला द्याल अशी आशा व्यक्त करते...!

विविध कार्यक्रमांची स्वप्नं पाहताना, माझ्यावर विश्वास ठेवून त्या स्वप्नांना प्रत्यक्षात आणण्यासाठी बळ देण्याचं काम; आपली बोर्ड ऑफ ट्रस्टीज, सर्व देणगीदार आणि जाहिरातदार यांनी मोलाची साथ दिली त्यांचीही मी शतशः ऋणी आहे.

Pillars of Strength and Character.

Premier Provider for Property and Casualty Insurance

HERITAGE®
Insurance

(855) 536-2744

www.heritagepci.com

WITH BEST COMPLIMENTS OF HERITAGE INSURANCE HOLDINGS, INC. AND VIJAY S. WALVEKAR, ONE OF ITS FOUNDERS AND DIRECTORS.

स्नेहबंध

COMMITTEE SPOTLIGHT

"एकी हेच बळ"

(भारती मेहेंदळे, मंजिरी जोशी, माधवी पुरेकर, किरण इंगळे, अंजली अंतुरकर, हर्षद अन्नीगिरी, स्वाती सुरडी आणि कौस्तुभ सुरडी)

यंदाची **कार्यकारी समिती (executive Committee)** अगदी छोटी म्हणजे आठ जणांचीच बनवली होती पण त्यात जुन्या, मध्यम आणि नव्या विचारांचे असे सर्व प्रतिनिधी घेतले होते. त्यामुळे सर्व वयाच्या लोकांचा विचार होऊन निर्णय घेता यायचा. प्रत्येक जण आपापली मते अगदी परखडपणे मांडायला मुक्त असायचा; पण एकदा का निर्णय घेतला की संपूर्ण टीमचा पाठिंबा असायचा...! BMM २०१७ मध्ये आम्ही सर्वांनी एकत्र काम केले असल्याने एक प्रकारची जवळीक होतीच पण ती आणखी दृढ झाली. इतर मंडळात दिसणारे राजकारण आम्ही प्रयत्नपूर्वक बाजूला ठेवले. प्रत्येक जण आपण होऊन जबाबदारीने आणि एकोप्याने कामे करीत होता त्यामुळेच आम्ही सर्व कार्यक्रम यशस्वीपणे पार पडू शकलो म्हणूनच म्हणावेसे वाटते "एकी हेच बळ"... !

"स्नेहबंध समिती"

(संजय मेहेंदळे, ज्योत्स्ना दिवाडकर, ऋतूज देशपांडे, मेधा उमरजी, उमा कानडे, सुशांत खोपकर, मानसी डहाणूकर)

स्नेहबंध समिती ही अगदी नावाला साजेल अशीच समिती आहे. इतक्या प्रेमाने आणि आपुलकीने हे सर्व जण बिनबोभाट कामे करीत असतात की असे वाटावे हे auto pilot काम आहे. ह्यांना कुणाला हे काम करा असं कधी आर्जव करायला लागलं नाही, कि कुणी ह्यांची प्रशंसा करेल म्हणून त्यांनी अपेक्षा केली नाही. आपल्या कम्युनीटीमधील लेखन-कौशल्य जागृत राहावे असा वसा घेऊन ही मंडळी passionately काम करीत असतात त्याला तोड नाही. येणाऱ्या सर्व लेखांना "नवरी नटली" या स्टाईलमध्ये छान छान चित्रं, पार्श्वभूमी देऊन एक सुंदर कलाकृती आपल्या हातात देण्यासाठी ही समिती झटतअसते; त्यांचे मनापासून कौतुक...!

"डेकोरेशन समिती" (वैशाली माहिमकर, प्रज्ञा तांबट, योगेश तांबट, मंजिरी महाजन, कांचन नाईक)

प्रत्येक कार्यक्रमासाठी रजिस्ट्रेशनच्या इथली सजावट, जेवणाच्या टेबलांवरची सजावट, पॅसेजेसमधे भिंतींवर लावलेली सजावट, रंगमंचावरची सजावट, कार्यक्रमाला अनुरूप अशी साजेशी भव्य रांगोळी..... या साऱ्यांनी प्रत्येक कार्यक्रमाच्या इथलं वातावरण कसं अगदी प्रसन्न झालेलं असतं..... आणि यामागे असतात डेकोरेशन टीमच्या कार्यकर्त्यांचे कुशल हात! प्रत्येक कार्यक्रमाच्या आधी कमीत कमी दोन-तीन तास आधी येऊन ही मंडळी झटून काम करतात, दर वेळेस नवीन कल्पना लढवून, सणाला साजेशी कलर थीम निवडून उठावदार माहोल तयार करतात. आणि बरं यांचं काम इथेच संपत नाही; तर कार्यक्रम संपल्यावर सजावटीच्या सामानाची आवराआवरही यांनाच करायची असते. सर्व कार्यक्रमांना सर्वात आधी येऊन कदाचित सर्वात शेवटपर्यंत थांबणाऱ्या लोकांमध्ये या टीमच्या कार्यकर्त्यांचा समावेश होतो.आपल्या अथक परिश्रमाने ही लोकं सर्वच कार्यक्रमांना खरोखरच चार चाँद लावत असतात.

Logistics (स्वाती सुरडी, केदार ओका)

पुलंच्या 'नारायणाचा' वसा घेतलेली ही मंडळी....! कार्यक्रम कुठलाही असो, यांच्याशिवाय पान हलत नाही हेच खरं. ऑडिओ सिस्टिम, प्रोजेक्टर, बेबी सिटिंगला लागणाऱ्या गोष्टी, बॅक स्टेजला, आर्टिस्ट लोकांसाठी ठेवायच्या गोष्टी अशा अनेक गोष्टींचे व्यवस्थापन यांना पाहावे लागते आणि ते चोख पारही पडावे लागते. सर्व गोष्टी स्टोरेज मधून आणणे आणि पुन्हा नेऊन ठेवणे हे कठीण काम ही कमिटी बिनबोभाट करते. प्रत्येक टीमबरोबर याना काम करावे लागते. हॉल बुकिंग, शाळेच्या टेक्निकल टीमबरोबर जुळवून घेऊन लाईट, साऊंड, लाऊड स्पीकर सर्वांची चोख व्यवस्था करून आपले घरचे कार्य सिद्धीस नेण्यासाठी या "नारायण" मंडळींचा मोठाच हातभार असतो.

रजिस्ट्रेशन टीम (ऋता देसाई, माधवी पुरेकर, शीतल सोनार, दीपक कुलकर्णी, लीना देशपांडे, सोनाली भाटे)

वरकरणी साधे वाटणारे हे काम.... प्रत्येक जण एक नवीन scenario घेऊन येतो आणि यांचे काम आव्हानात्मक होऊन जाते. पण हसतमुख राहून प्रत्येक मेम्बरला एक छान अनुभव देण्यासाठी ही कमिटी अगदी तत्पर असते. नव्या मोबाईल प्रणालीचे तंत्रज्ञान वापरून हे काम खूप तत्परतेने करताना पाहून बऱ्याच सभासद नसलेल्या लोकांनी उत्स्फूर्त दाद दिली.

“अतिथी देवो भव” (आर्टिस्ट्स होस्टिंग टीम: हेमा राचमाले, दीप्ती शारंगपाणी, दीपा इंगळे)

आदरातिथ्य करण्याच्या आपल्या परंपरेला साजेसं असं या टीमचं काम! भारतातून येणाऱ्या कलाकारांचे त्यांच्या आवडीप्रमाणे यथायोग्य पाहुणचार करण्याचे काम ही समिती अगदी प्रेमाने करते. त्यांना एअरपोर्टवरून आणण्या पासून चहा-कॉफी, जेवण-खाण्याची, राहण्याची व्यवस्था, sight seeing एक ना अनेक! पण येणाऱ्या कलाकारांना “home away from home” हा अनुभव देण्यासाठी ही कमिटी सतत प्रयत्नशील असते.

“तंत्रज्ञान समिती (IT)” (शीतल सोनार, मेधा करकरे, तुषार गोखले)

आजच्या इंटरनेटच्या युगात मंडळाची वेबसाईट हाच मंडळाचा चेहरा बनला आहे. सातत्याने नवीन तंत्रज्ञान अंगीकारणे आणि वेबसाईट सतत काळाबरोबर राहील; हे काम न संपणारे आहे. ही समिती नवनवीन तंत्रज्ञान वापरून आपले काम सोपे कसे करता येईल यासाठी जागरूक असते. मंडळाच्या आगामी कार्यक्रमांच्या जाहिराती, पे-पाल ऑनलाईन पेमेंट सिस्टिम, नाटक सीटिंग आणि ऑनलाईन बुकिंग, RSVP, Confirmation Email, कार्यक्रमानंतर त्याचे reviews, फोटो असे एकानंतर एक काम अव्याहत चालू असते. हे सर्व वर्षभर उत्साहाने करणाऱ्या आणि मंडळाचा चेहरा सतत फ्रेश ठेवणाऱ्या या टीमला सलाम...!

“हाती घ्याल ते तडीस न्या”

प्रोग्रॅम मॅनेजर्स (श्रुती बोस, सोनाली साठे, मेधा उमरजी, जय मुंज, प्राजक्ता केतकर, अमर आवळे, प्रणव औंधकर, शीतल सोनार, सोना पाटील, सुशांत खोपकर, मानसी डहाणूकर, प्रशांत जावकर, विक्रांत पटवर्धन)

एखादा प्रोग्रॅम मॅनेज करायचा म्हणजे घरच्या कार्यासारखंच आहे. अथपासून इतिपर्यंत म्हणजेच प्रोग्रॅम काय करायचा, कसा करायचा, कुठे करायचा, कोण आर्टिस्ट्स येणार, मार्केटिंग कसे करायचे, प्रॉप्स काय लागणार, डेकोरेशन काय करायचे या सर्वांचे सूत्रसंचलन म्हणजे तारेवरची कसरत... ! पण या सर्व प्रोग्रॅम मॅनेजर्सनी ही कसरत अगदी लीलया पेलली. “हाती घ्याल ते तडीस न्या” ह्या म्हणीप्रमाणे एकदा जबाबदारी स्वीकारली की ती तडीस न्यायला ही मंडळी कटिबद्ध होती.

“साथी हात बढाना” (कमी तिथे आम्ही)

मंडळाचा आजचा वाढता व्याप पाहता हे काही एकट्या-दुकट्याचं काम राहिलेलं नाही. हा जगन्नाथाचा रथ ओढायला अनेक हातांची गरज भासते. सर्वांनी मिळून हे काम करताना एक वेगळाच आनंद मिळतो. वर्षभर काम करायची जबाबदारी घेता येत नसली; तरी वेळ मिळेल तेव्हा मदत करायची ज्यांची इच्छा असते त्याच्यासाठी खास “**कमी तिथे आम्ही**” ही समिती आपण स्थापन केली. मला सांगायला आनंद वाटतो की यामुळे छोट्या छोट्या कामाचं वाटप करणं खूप सोपं झालं. एखादे काम करण्यासाठी स्वयंसेवक हवे आहेत (**साथी हात बढाना**) असा Whats App वर मेसेज टाकला की ५-७ लोक हात वर करून कामाला तयार...!

नेहेमी आपल्याला गरमागरम चहा देणाऱ्या दीपा बंड आणि संपदा बुरांडे, बॅकस्टेज सांभाळणारे वर्षा आणि उदय पाथरे, फोटो-व्हिडिओचे काम करणारे सुहास साठे, पियुष करकरे, प्राजक्ता कुलकर्णी आणि श्रीकांत भागवत, स्टेज-ऑडिओ-लाईट आणि साऊंड सांभाळणारे मनोज पाटील, अभिजय काणे, सुनील केळकर, हर्षद अन्नीगिरी अशी अनेक मंडळी पडेल ते काम करायला तयार असतात त्यामुळे हा जगन्नाथाचा रथ सहजपणे ओढला जातो आणि मंडळाचे काम “काम” न वाटता एक आनंद मेळावा होऊन जातो. अश्या उत्स्फूर्त स्वयंसेवकांची टीम मला लाभली हे मी माझं मोठं भाग्यच समजते.

भारती मेहेंदळे

KRISBI TRAVEL

NEW SITE NEW BRAND
SAME GREAT SERVICE

B2C TRAVEL PORTAL

WWW.EZTOFLY.COM

START FLYING THE EZ WAY

- ✓ One stop shop for all your Travel needs
- ✓ Custom Tour Packages
- ✓ Flights
- ✓ Cruises & much more...

Call Today for a
personalized service
Phone: 248-569-8668
Email: Detroit@krisbitravel.com

सांग दर्पणा कशी मी दिसते

तो माझा ६६ वा वाढदिवस होता. अमेरिकेत राहणाऱ्या लोकांचा श्रमसाफल्याचा वाढदिवस.... medicare मध्ये enrollment झालेली असते, social security चा चेक दर महिन्याला हातात पडत असतो, आणखी भर म्हणजे pension सुध्दा चालू झालेली असते. मुलांची लग्नं होऊन नातवंडांचं आगमन झालेलं असतं. याच्यापेक्षा आणखी काय हवं?

मी तर अगदी नवव्या cloud वर होते. संध्याकाळी माझी मुलगी आणि नातवंडं मला भेटायला आली. येताना माझ्या नातवाने एक चित्र काढून मला बर्थडे कार्ड म्हणून दिलं. त्या चित्रात एक cake होता. Cake वर भरपूर कॅण्डल्स होत्या, Cake च्या एका बाजूला एक लहान मुलगा आणि दुसऱ्या बाजूला एक मोठा माणूस. नंतर त्याने मला चित्राचं वर्णन केलं. Cake वर फ्रॉस्टिंग आहे. Cake च्या एका बाजूला आजी आणि दुसऱ्या बाजूला तो स्वतः उभा आहे. मी त्याच्या बर्थडे कार्डचं कौतुक करीत होते, इतक्यात त्याने एक बॉम्ब टाकला. त्याने मला विचारलं

Aaji are you 100 years old?

Aaji: not yet raja!

Is Aaba 100?

Aaji: not yet!

You guys look very very old!!!!

अस्सा राग आला. म्हटलं चोरा, आजी एवढे लाड करते आणि हेचि फळ काय मम तपाला? नंतर मीच माझ्या मनाची समजूत घातली, त्याला काय कळतंय? ५०, ६०, १०० वर्षं, सर्व सारखीच त्याला!

नंतर आम्ही cake कापला आणि वाढदिवस साजरा झाला.

पण माझ्या मनातून विचार जाईना "खरंच आपण एवढे म्हातारे दिसतो का? "आजोबांचं ठीक आहे. टक्कल, पिकलेले केस, डोळ्यावर चष्मा, दिसतात थोडे म्हातारे, पण माझं तसं नाही. अजूनही काळेभोर केस अगदी REVLON NATURAL BLACK #2 shade सारखे, दोन्ही डोळ्यांची cataract ची operations झालेली, त्यामुळे चष्मा लागत नाही. Glasses always add few more years to your age. शिवाय diabetes मुळे बरंच वजन उतरलं आहे. त्याचा तरुण दिसण्यात मोठा वाटा असतो. मात्र हल्लीच चेहऱ्यावर थोड्या रेषा दिसायला लागल्या आहेत हे खरं! पण बाकी सर्व माझ्या favor मध्येच आहे. तरीसुध्दा मी एवढी म्हातारी दिसते का?

तसं पहायला गेलं तर जेव्हा जेव्हा मी फेसबुकवर माझा profile फोटो update करते, तेव्हा माझ्या मैत्रिणी इतक्या छान comments करतात

"what is the secret of your youthful look?"
"You haven't aged at all!"
"day by day you are looking younger and younger!"

खोटारड्या मेल्या!!!

नातवाच्या remark मुळे बेचैनी मात्र वाढत गेली. नको त्या जुन्या आठवणींना उजाळा आला.

काही वर्षांपूर्वी मी मुंबईत linking road वर शॉपिंगला गेले होते आणि एका सुमारे १६-१७ वर्षांच्या मुलाबरोबर bargain करीत असता तो मला म्हणाला "आप तो मेरी नानी जैसी है, आपको कायको फसावू?" आणि त्यावेळेस तर मी सुमारे पन्नाशीचीच होते. मला खरा त्याचा राग आला होता. माँ जैसी किंवा मौसी जैसी म्हटलं तर ठीक होतं पण एकदम नानी? नंतर विचार केला, याच्या फॅमिलीतल्या बायकांना लहान वयात मुलं होत असावीत (त्या शाळा कॉलेज मध्ये थोड्याच जातात!) मग तर कोणीही ३५व्या वर्षीपण आजी होऊ शकते.

एकदा मराठी वृत्तपत्रात एक लेख वाचत होते, त्यात लिहिलं होतं "एक साठ वर्षांच्या आज्जीबाई.....". साठ वर्षांच्या बाईला आजी म्हणणं गोष्ट वेगळी पण काय आज्जीबाई म्हणायचं? आजी आणि आज्जीबाई ह्यात १५-२० वर्षांचा फरक आहे. आज्जीबाई म्हटलं की डोळ्यासमोर सुरकुतलेल्या चेहऱ्याची, तोंडाचं बोळकं झालेली, जख्ख म्हातारी उभी राहते. ही "आज्जीबाईची age limit एवढी साठ वर्षांपर्यंत खाली कधी आली?"

पण आत्ता आपल्याला तरुण दिसण्यासाठी काहीतरी केले पाहिजे ही भावना मनात पक्की झाली. नेहमी प्रमाणे घरचा डॉक्टर DR. GOOGLE उपचार सांगायला सज्ज होताच. त्याने ५-७ महागडी antiwrinkle face creams recommend केली. पण एकदा तुम्ही हट्टाला पेटला की मग महाग काय आणि स्वस्त काय.... घातले social security चे पैसे कॉस्मेटिक कंपनीच्या घशात. पहिले थोडे दिवस जरा नेमाने क्रीम चोपडलं. पण नंतर मात्र विसर पडायला लागला आणि त्याची frequency कमी कमी होत पूर्ण-विराम गाठला. नंतर खूप दिवसांनी क्रीमची पुन्हा आठवण झाली म्हणून बाटली उघडली तर क्रीमला पाणी सुटलं होत.... बाटली फेकून दिली, तरीपण मनाला वाटलं की cream चा थोडा तरी उपयोग झाला असावा.

म्हणतात ना, आरसा कधी खोटं बोलत नाही! म्हणून ठरवलं त्यालाच विचारूया "सांग दर्पणा कशी मी दिसते?" तर आरसा म्हणतो कसा, "अग वेडी की काय तू? माणसाचं वय त्याचा चेहरा सांगत नाही तर त्याचं मन आणि वागणूक यांच्यातच दिसतं. तू जर तुझ्या तेरा वर्षांच्या नातीसारखी वागायला लागलीस की तू पण teenager दिसशील. अकाली वार्धक्य येणारी माणसं कमी का आहेत या जगात?" म्हणजे आता real age पेक्षा biological age आणि behavioral age विचारात घेतलं पाहिजे. उत्तररंगियानो फेकून द्या तो चष्मा, करा केस काळे आणि जॉईन करा disco dance क्लब!!!

शमा सुखटणकर

Happy Travelling

. . .at the lowest price

Clickontours.com

Holiday just a click away!

ClickOnTours is a full-fledged travel agency dedicated to the comfort of travelers. Our offices are located in Canada, US, UK and India.

From most economical airfares, cost-effective and customized hotel bookings, business tours, world cruises, family holiday packages, to car rentals, we offer the finest feast of services for every travel need.

Enjoy lowest airfare for business economy on any airline

Find the best cruise easily with the help of our experts

Lowest hotel room tariff within USA & across the world

Key features:

- Cost-effective & customized airfares, hotel bookings, car rentals
- Lowest rates guaranteed
- Affordable world cruises (USA / Canada / UK / Australia / India)
- Exclusive vacation packages from Alaska to Auckland
- Worldwide service centers

For the best travel deals,
call us on **+14252562109** *OR*
contact us on **sales@clickontours.com**

Toll-free 877 239 1312

अमेरिका की इंडिया

पुढे आहे अमेरिका पाठीमागे इंडिया
त्रिशंकूसारखा मी आता लोंबतो आहे
इथे नगरी कशा आहे सुंदरी
पैसेवाल्या नोकरी गोऱ्यापान छोकरी
सोडूनी जावे कसे हा हा हा हु हु हु हु
सोडूनी जावे कसे समजत नाही

दिवाळी मी बघू कधी लाडू बुंदी खाऊ कधी
बालपणाच्या त्या साऱ्या गप्पागोष्टी करू कधी
त्या जुन्या आठवणी हा हा हा हु हु हु हु
त्या जुन्या आठवणी संपतच नाही

जन्मजन्मांचा हा लोभी सारखा भटकतो
कधी पुणे कधी मुंबई आणि आता अमेरिका
स्थाईक व्हावे कुठे हा हा आ हा आ आ
स्थाईक व्हावे कुठे समजत नाही

निरंजन हुंबड

CENTRAL HOME HEALTH CARE, INC.

Quality Home Health Care Since, January 1985
JCAHO Accreditation Since 1991

Do You Have……..

1. Joint, Neck, or Back Pain or Joint Stiffness?
2. Poor Circulation or have a Wound that is not healing?
3. Diabetes, Heart, and/or Respiratory Problems?
4. A Cardiac diagnosis that affects your quality of life?
5. A previous Stroke, Accident or Fracture(s)?
6. Difficulty with walking or a history of falls?
7. Or will have a Hip/Knee/Shoulder Replacement?
8. Problems with frequent Hospitalizations?

If so, then you may be eligible for home care services from Central Home Health Care.

WHO PAYS?

Your Insurance will pay **IN FULL** if you have Medicare, Medicaid, BCBS, Auto, or Private Insurance.

WHAT YOU NEED TO DO?

Call our number below or ask your physician/social worker to call us to make a referral.

WHAT DO WE OFFER?

Nursing, Physical Therapy, Occupational Therapy, Speech Therapy, Medical Social Work, Home Health Aide Services, Registered Dietician Services.

WE COVER THE METRO-DETROIT (TRI-COUNTY) AREA

Ph: (800) 698-5410 – Fax (248) 569-5412

Owned and Operated by the Walvekar Family
20245 W. 12 Mile Road, Ste. 100, Southfield, MI 48076.
www.centralhomecare.com

दीपदान

Women's College आणि "दीपदान" नृत्य-नाट्य

१९३२ साली नागपूर शहरांत स्त्रियांसाठी स्थापन झालेल्या या विद्यालयाचं महत्व कांही और होतं. त्या काळांत पश्चिम महाराष्ट्रांत तरी स्त्री-शिक्षण हीच एक वादग्रस्त भानगड होती. विभावरी शिरूरकरांच्या स्त्री-स्वातंत्र्यावरच्या लिखाणावर टीकेची झोड उठायला अजून कांही काळ असावा, पण "स्त्री-स्वातंत्र्य म्हणजे संस्कृतीच्या ऱ्हासाची सुरुवात", असं काहीसं बहुतेकांचं मत असायचं. सुदैवानी सेंट्रल प्रोव्हिन्सेस अँड बेरार या नावानी प्रसिद्ध असलेल्या मध्य-भारतात फारसे संस्कृती रक्षक नसल्यामुळे म्हणा, "laissez faire" नामक आरामशीर वृत्ती सर्वदूर पसरली असल्यामुळे म्हणा, किंवा विलायती संस्कृतीला जवळून बघितलेल्या श्रीमंत संस्थानिकांची गरज म्हणून की काय, या संस्थेला फारसा अडथळा आला नसावा. श्रीमंत संस्थानांच्या राजकन्या, सरदार-दरकदारांच्या मुली, सुशिक्षित, सुसंस्कृत घरच्या मुली जिथे शिकायला दूरवरून येतात, तिथे आपल्या घरच्या मुलींना शिकायला पाठवायला हरकत नसावी, असा त्या भागांतल्या मध्यम वर्गाचा समाज झाला असावा.

माझी आई या कॉलेजांतून शिकून बाहेर पडली, आणि तिने ग्वाल्हेर संस्थानाच्या सिंदिया पब्लिक स्कूल संस्थेंत शिक्षिकेचं पद स्वीकारलं. सोबतच माझ्या वडिलांच्या प्रोत्साहनामुळे तिचं स्वतंत्र लिखाण, पुस्तकांसाठी लिहिलेल्या प्रस्तावना, लहान-मोठ्या प्रेक्षकवृंदांसमोर दिलेली भाषणं, अशा गोष्टी थोरामोठ्यांच्या निदर्शनास येऊ लागल्या, आणि मग कांही वर्षांतच तिला नागपूरच्या या सुप्रसिद्ध कॉलेजांत प्राध्यापिकेचं पद मिळालं.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या सुमारास आणि बरीच वर्षं नंतर सुद्धा जनतेच्या उत्साहाला उधाण आलं होतं, आणि स्त्री-शिक्षणाला वाहून घेतलेल्या या पुरोगामी आणि तरीही ग्लॅमरस अशा संस्थेच्या सांस्कृतिक कार्यक्रमांना स्थानिक आणि दूरवरच्या वर्तमानपत्रांत भरपूर प्रसिद्धी मिळत असे. पंडित नेहरूंनी सुरू केलेल्या वार्षिक Youth Festivals मध्ये या संस्थेच्या मुलींनी सादर केलेल्या कार्यक्रमांना नागपूर विश्वविद्यालय भाग घ्यायची संधी आवर्जून देत असे. यांपैकी १९५५-५६ च्या सुमारास प्रथम सादर करण्यांत आलेला, आणि नंतरही अनेक वर्षं वेगवेगळ्या निमित्तानी, सर्वदूर दाखवण्यात आलेला एक कार्यक्रम होता "दीपदान" हे नृत्य-नाट्य. दिवाळीच्या संदर्भांत रचलेल्या या नृत्य-नाट्याची श्रेय नामावली:

संकल्पना आणि शब्दरचना: शंकर बाळाजी शास्त्री
संगीत: गोपाळ कौशिक (यांनीच पुढे पुरुषोत्तम दारव्हेकरांच्या "चंद्र नभीचा ढळला" आणि इतर नाटकांना देखील संगीत दिलं)
निर्मिती: प्रा. तारा शास्त्री
कलाकार: Women's College च्या विद्यार्थिनी
.....

" दीपदान "

(तारकांचे नृत्य)

या गं या s s या गं या s s या गं या s s

या गं या सखयांनो या, दीप उजळूया
संध्या मातेच्या कन्यांनो पणत्या उजळूया, दिवल्या उजळूया
या गं या सखयांनो या, दीप उजळूया

आभाळाचे विशाल ताट, उजळू दिव्यांचा लखलखलाट
तारा ग्रह नक्षत्र पाजळू, ओवाळू चला - १

स्नेहबंध

मंगळ झाला मंगल कुंकुम, हळद टिळा हा गुरु ग्रह अनुपम
अमानिशेचे नयनी काजळ, शोभा पाहूया - २

लक्ष्मी अपुल्या घरास आली, तिच्या स्वागता रचू दिवाळी
चला चला गं या सखयांनो, दिवल्या उजळूया - ३

लक्ष्मीचे हे रूप मनोहर, मायेचे नव ल्याली अंबर
चराचरा मधे तीच अगोचर, तिजला पाहूया - ४

या गं या सखयांनो या, दीप उजळूया ...

(धरणीचे नृत्य)

घे माते, तव चरणीं, धरणीचे शत प्रणाम ।
स्वीकारी स्वागत हे, चरणी तव शत प्रणाम ।।

वर्षेनें शिंपियले सडे स्वच्छ अंगणांत
दुर्वा तृण पर्ण फुले रांगोळ्या घालतात
चरण स्पर्श माते तव करो धन्य धरा धाम
स्वीकारी स्वागत हे, चरणी तव शत प्रणाम - १

मलयानिल मंद मंद हेचि तुला धूपदान
जलप्रपात निर्झर संगीत तुझे स्तवन गान
आशेच्या दीपाने ओवाळूं तुज सकाम
स्वीकारी स्वागत हे, चरणी तव शत प्रणाम - २

ऋद्धि-सिद्धीने भरला पूर्ण कुंभ वसुधेचा
हा तुज नैवेद्य भला देवी आज अर्पियला
अर्पिले तुझेचि तुला, देवी तुज शत प्रणाम
स्वीकारी स्वागत हे, चरणी तव शत प्रणाम - ३

घे माते, तव चरणीं, धरणीचे शत प्रणाम ।
स्वीकारी स्वागत हे, चरणी तव शत प्रणाम ।।

(मानव आणि लक्ष्मी यांचे नृत्य)

आम्ही मानव ! आम्ही मानव ! आम्ही मानव !

स्त्री + पुरुष: आम्हा मानवांच्या बळा नाही सीमा
असे कोण जो रोधू आम्हा शके?
आम्ही विक्रमी बुद्धिशाली आम्ही
सूर्य चंद्रादि आम्हा पुढे ते फिके

पुरुष: विजेते आम्ही सृष्टीच्या वैभवाचे
पुढे आमुच्या सिद्ध सारी सुखे
आम्हा सृष्टीच्या लाडक्या मानवांना
न कोणी, न कोणी विरोधू शके

स्त्री: रुण झुण, रुण झुण, चरणीं नुपूर
कोमल कंठीं मधु रव सुस्वर
रुण झुण, रुण झुण, चरणीं नुपूर

स्त्री + पुरुष: आम्हा मानवांच्या बळाचे, यशाचे
जयाचे, गुणाचे, कलावैभवाचे
रूप तुला दावाया योजिली दीपावली
ये लक्ष्मी, हो प्रसन्न, दीप दान स्वीकरी,
दीप दान स्वीकरी
ये लक्ष्मी ये, ये लक्ष्मी ये ...

लक्ष्मी: हेच काय, दीपदान, मानवा तुझे रे
लक्ष्मीच्या पूजनार्थ, दीप काय हेच रे

पुरुष: रुचले कां हे न तुला, माते हे तव पूजन
स्त्री: काय कमी येथ दिसे, उणे काय राहिले

लक्ष्मी: लखलखत्या दिवल्यातुनि मजसी दिसे अंधःकार

स्त्री + पुरुष: काय? अंधःकार??

स्नेहबंध

लक्ष्मी: अंधःकार, अंधःकार, अंधःकार, अंधःकार
दावितात दीपक हे केवळ तव अहंकार
पुरुष: ओळखणे स्वबळाते, विक्रम सामर्थ्याते
स्त्री: तैसे सौंदर्याच्या संमोहक शक्तीते
स्त्री + पुरुष: हा कैसा अंध:कार, यांत कसा अहंकार

लक्ष्मी: मानवा दिधले तुवा, बळ बुद्धीचे विधीने महा
त्या बुद्धीच्या योगे तुवा जग जिंकिलेसी महा
परि जिंकिले ना तुवा स्वार्थास रे, लोभास रे
विश्व विजयी वीर तू स्वार्थापुढे बलहीन रे

धरणीच्या छातीवर पाडीले तडे
शिंपियले गगनांतुन रक्ताचे सडे
हेचि तुझे संमार्जन, याची रांगोळ्या
लक्ष्मीच्या पूजनार्थ स्वजनांच्या आरोळ्या

करू बघसी पूजेने तू मला प्रसन्न
पाहुनी तव स्वार्थ असा, मानस मम अतिव खिन्न
अतिव खिन्न! अतिव खिन्न! अतिव खिन्न! अतिव खिन्न!

स्त्री + पुरुष: आज नेत्र उघडले, मानव किती हीन दीन
हेच आज पाहिले ...

लक्ष्मी: निवटुनी तव अज्ञाना उजळू दे नव प्रकाश
नि:स्वार्थी सेवारत होऊनि करि निज विकास
हीच खरी दीपावली, हेच खरे दीपदान
हेच खरे आराधन, हेच खरे मन प्रसन्न
मन प्रसन्न ... मन प्रसन्न ... मन प्रसन्न .

टीप: स्वातंत्र्योत्तर काळांत बऱ्याच वर्षांनी या कॉलेजचं नांव LAD (लेडी अम्रिताबाई डागा) College for Women असं झालं, आणि सध्या त्याच संस्थेला Lady Amritabai Daga and Smt. Ratnidevi Purohit College for Women असं म्हणतात.

सिद्धार्थ शास्त्री

With Best
Compliments from

Gangadhar and Pushpa Vaishampayan

RoyalCaribbean INTERNATIONAL

Jaya Travel & Tours Presents

Bollywood Experience with MEET BROS & Khushboo

***PLUS:* Deepak Rao ESP show and Video DJ parties!**

EXCLUSIVE FOR:
Dhoom Dhamaka Passengers with Jaya Travel & Tours *ONLY!*

Starting from
$1,308*
per person
**Tax and gratuity not included*

7-NIGHT CRUISE
July 3 - 10, 2020

Itinerary

Day 1: (Departure) Seattle, Washington (Set Sail)
Day 2: Cruising
Day 3: Alaska Inside Passage (Cruising)
Day 4: Skagway, Alaska
Day 5: Endicott Arm and Dawes Glacier (Cruising)
Day 6: Cruising
Day 7: Victoria, British Columbia
Day 8: Seattle, Washington (Return)

Delicious **INDIAN CUISINE** (veg, non-veg, and Jain)

Don't forget to ask about our low airfare, booking for hotels, airport transfers and insurance

Cabins are filling fast. Call Jaya and book today!

877-359-5292 | JAYATRAVEL.COM
**For complete details visit our website*

JAYA TRAVEL & TOURS

स्नेहबंध

किल्ला दिवाळीचा

“अरे चला चला... किल्ला बनवायचाय ना... दुसऱ्या ग्रुपचा किल्ला तयार पण होतोय, उठा लवकर...! “दिवाळीच्या आठवडाभर आधी घरी आया-बायांची फराळ बनवण्यासाठी लगबग चालू असे; तर आम्हा मुलांचे गहन “किल्ला प्रोजेक्ट प्लांनिंग” चालू होई. या वर्षी कोणत्या गडाला आणायचे आपल्या कॉलनीत?” मग आमचा म्होरक्या महेश, (आमच्यातील १-२ वर्षे मोठा असलेला एक जण) लगेच कामाचे वाटप करून टाके. “दीपा आणि मोना तुम्ही चांगली माती आणा ढेकळं नकोत; आणि दगड नकोत त्यात”. “श्रीकांत आणि मंदार तुम्ही शेण आणायला जा”.... “मी आणि गुड्डी बाजारात जाऊन अळीव, शिवाजी महाराज आणि सैनिक आणतो”. “पप्या तू बादलीभर पाणी आण”. “आईशी भांडू नकोस, गोड बोलून करा रे सगळे” (नाहीतर सगळ्या प्लॅनिंगवरच पाणी !). “रूपा तू रंग घेऊन ये”. “रजुताई, तू रांगोळी आण”. “कपिल, संदीप आणि धनु तुम्ही तयार राहा; हे सगळे सामान आले की लगेच गड घडवायला सुरुवात करायची आहे. वेळ घालवायचा नाही. एका दिवसात करायचेय, कळलं ना?”

आपल्या महाराष्ट्रातील किल्ले, गड या सा-यांना फार प्राचीन काळापासून अनन्यसाधारण महत्त्व आहे. दिवाळीत किल्ले बनवण्याची परंपरा ही आपल्या पूर्वजांनी आपला गौरवशाली इतिहास लहान मुलांनी अभ्यासावा याकरता निर्माण केलेली एक संधी आहे. मुख्यत्वे महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांमधे, विशेषत्वाने दिवाळीला किल्ले बनवण्याची पद्धत दिसून येते. महाराष्ट्र म्हटले की पहिली आठवण होते शिवाजी महाराजांची!! शिवाजी राजांनी खूप लहान वयात प्रचंड पराक्रमाने छोट्या मावळे मित्रांच्या सहाय्याने स्वतःचे स्वराज्य निर्मिले. त्या प्रोसेसमध्ये गड जिंकणं आणि किल्ले बांधणे हा मोठा भाग असे. आपल्याकडे भुईकोट (सपाटीवरील किल्ला), जलदुर्ग (पाण्यातील किल्ला) आणि गिरिदुर्ग (डोंगरावरील किल्ला) असे किल्ल्याचे तीन प्रकार दिसतात. यामध्ये दिवाळीत अनेक जण डोंगरी किल्ला तयार करतात. डोंगरी किल्ले गनिमी काव्यासाठी प्रसिद्ध! म्हणून मुलांना त्याचे जास्त आकर्षण!!

स्नेहबंध

दिवाळी हा भारतीयांच्या जीवनातील मोठयात मोठा सण. सगळ्याच प्रकारचे पराक्रम साजरे करण्यासाठी दिवाळी-सारखे निमित्त नाही. शिवाजी राजे आणि मराठी साम्राज्याच्या ऐतिहासिक आणि असाध्य पराक्रमाची आठवण म्हणून पूर्वजांनी लहान मुलांना दिवाळी किल्ले बांधायचे आणि काही ठिकाणी फटाक्यांनी छोटी लढाई सुद्धा खेळायची प्रथा सुरु केली. प्रत्येक गटाने दुसऱ्या गटाच्या किल्ल्यावर आधी फटाका ठेवून किल्ला सर करायचा आणि लवकर उठून पहाटेपासून आपल्या किल्ल्यांचे रक्षण करायचे. ज्याच्या किल्ल्याचे रक्षक उशिरा उठतील त्यांचा किल्ला सर झालाच म्हणून समजा. लहानपणी आम्ही आणखी पुढे जाऊन जिंकणाऱ्या किल्ल्याच्या गटाला राज्याभिषेकही करत असू. नियम हा असे की आपल्या किल्ल्यावर फटाका फुटला; तर हार मानून फटाका ठेवणाऱ्याच्या गटात सामील होणे.

आता इथे अमेरिकेत मुलांना 'क्ले'चा छोटा किल्ला करून घरासमोर ठेवायला लावतो इतकाच काय तो लहानपणीचे गोड अनुभव पुढच्या पिढीला सांगण्याचा आणि आपली संस्कृती टिकविण्याचा interesting आणि छोटासा उपक्रम!

शीतल सोनार

ninad

सस्नेह आवाहन

आपल्या डेट्रॉईटचं भाग्य हे की निनाद जोशी नावाचा एक अतिशय गुणी कलाकार, कार्यकर्ता, माणूस आपल्याला मिळाला आणि आपल्या डेट्रॉईटचं दुर्भाग्य हे की गेल्या वर्षी कर्करोगामुळे तो आपली साथ सोडून गेला. निनाद हा एक उत्तम लेखक होता. मराठी-इंग्रजी दोन्ही भाषांवर त्याचं प्रभुत्व होतं. MMD च्या 'स्नेहबंध' चा काही वर्षांपूर्वी तो मुख्य संपादक होता. BMM २०१७ मध्ये कम्युनिकेशन्स समितीचा प्रमुख या नात्याने निनादने मोलाची कामगिरी केली होती. निनाद एक उत्तम गायक होता. त्याला संगीताची जाण होती. कार्यक्रमाला 'साऊंड' ची जबाबदारी निनादने घेतली की तो श्रवणीय झालाच म्हणून समजा, हे एक समीकरणच झालं होतं. MMD २०१५ संक्रांतीचा 'जब वी मेट' हा सुपरहिट कार्यक्रम लोकांच्या अजून लक्षात आहे. निनाद त्याचा लेखक-दिग्दर्शक होता! या शिवाय त्याला क्रिकेट या विषयाचं केवळ उत्तम ज्ञानच नव्हतं, तर तो स्वत: एक उत्तम खेळाडू आणि त्यांच्या टीमचा कॅप्टन होता.

निनादने एकदा अशी इच्छा बोलून दाखवली होती की आपण 'स्नेहबंध' सारखा एक असा अंक काढला पाहिजे जो फक्त डेट्रॉईट किंवा मिशिगन पुरता मर्यादित नसून संपूर्ण नॉर्थ अमेरिकेत उपलब्ध असेल. अमेरिकेतल्या गुणी लेखकांच्या आणि भारतातील प्रथितयश कलाकारांच्या साहित्याचा त्यात समावेश असेल. निनादची ही दूरदृष्टी, ही इच्छा पूर्ण करायला आम्ही काही जण एकत्र आलो आणि 'निनाद' नावाचा एक दर्जेदार वार्षिक अंक काढायचा असं ठरवलं. भारतातील काही नामवंत कलाकार, साहित्यिक, तसेच उत्तर अमेरिकेतल्या उत्तम लेखकांचं आम्ही काही साहित्य जमा केलं असून त्याची सुंदर बांधणी करून ते आपल्यापर्यंत पोहोचवण्याचा आमचा मानस आहे.

साधारण डिसेंबर २०१९ च्या शेवटी हा अंक उपलब्ध होणार असून त्याची किंमत $१० इतकी असेल. हा अंक आम्ही निनादच्या प्रेमापोटी करत असून या प्रकल्पात कुठलाही नफा मिळवण्याचा आमचा प्रयत्न नसेल. साहित्य, संगीत, कला, क्रीडा अशा विषयांवरचे लेख, तसेच कविता, शब्दकोडे, व्यंगचित्र अशा गोष्टींचाही त्यात समावेश असेल. या अलौकिक ठेव्याची थोडी प्रतीक्षा करा. हा अंक वाचून तुमच्या मन:पटलावर सुखाच्या लहरी उमटू देत. हा 'निनाद' नावाचा अंक तुम्हाला आनंद देवो, हीच सदिच्छा!

'निनाद' अंकाचं हे पहिलंच वर्ष असल्यामुळे अंकाच्या मर्यादित प्रति छापण्यात येतील. आपण हा अंक घेण्यास उत्सुक असाल तर आजच आम्हाला खालील पत्त्यावर तुमचं नाव, पत्ता, इ-मेल, फोन नंबर आणि प्रतींचा आकडा कळवा. अंकांची छपाई सुरु व्हायच्या आधी ज्यांची नावं आमच्या पर्यंत येतील त्यांना अंक मिळायची आम्ही हमी देतो.

तुम्हाला या अंक 'निनाद' टीम चा भाग व्हायचा असेल, तरी आम्हाला कळवा. तुमचं स्वागत आहे.

ank.ninad@gmail.com

अमिता जोशी, अंजली अंतुरकर, गौरी अलाटे, ज्योत्स्ना दिवाडकर, किरण इंगळे, मानसी डहाणूकर, मेधा उमरजी, नितीन जोशी, संजय मेहेंदळे, सायली मोकाटे, सुशांत खोपकर, उमा कानडे

स्नेहबंध

अमेरिकेतून भारतीय उत्सवाकडे पाहताना

जगभर भारत अनेक सांस्कृतिक आणि पारंपारिक सणांचा देश म्हणून ओळखला जातो; कारण त्यात अनेक संस्कृती आणि धर्म आहेत. भारतातील उत्सव देशातील समृद्ध सांस्कृतिक वारसा चित्रित करतात. भारत धर्म, भाषा, संस्कृती आणि जातींमध्ये विविधतेने नटलेला धर्मनिरपेक्ष देश असल्याने नेहमीच मेळावा आणि उत्सव साजरे केले जातात.

अनुष्ठान, विश्वास आणि त्याच्या महत्त्वपूर्ण इतिहासानुसार प्रत्येक उत्सव वेगवेगळ्या प्रकारे साजरा केला जातो. प्रत्येक उत्सवाचा स्वतःचा इतिहास, पौराणिक उत्सव आणि उत्सवाचे महत्त्व असते. सर्व सण एक किंवा दुसऱ्या प्रकारे सांस्कृतिक आहेत. राष्ट्रीय, धार्मिक आणि मौसमी अशा अनेक प्रकारचे सांस्कृतिक सण आहेत. भारतामध्ये समृद्ध संस्कृती आहे आणि संपूर्ण वर्षभर मोठ्या प्रमाणात उत्सव साजरे केले जातात. लोकांना असे वाटते की हे फक्त एक आनंदी ठेवण्यासाठी आहे. हे अंशतः खरे असले तरी, या सणांच्या उत्सवासाठी आंतरिक अर्थ आहेत. जेव्हा रोजच्या धकाधकीच्या जीवनांत एकाकीपणा, अभ्यास आणि कार्यप्रणाली त्रासदायक बनते तेव्हा उत्सवांचे महत्त्व लक्षांत येते.

सण हे विविधतेला प्रोत्साहन देतात, ते परस्परांमध्ये संवाद आणतात, निर्मितीक्षमतेत वाढ करतात, नागरी अभिमानाची संधी देतात, ते आपले सर्वसाधारण मानसिक आरोग्य सुधारतात. थोडक्यात, ते देशाला जगण्यासाठी चांगले स्थान बनवतात. सण हे आनंद, उत्साह, आशा, आशावाद, उत्सव, प्रकाश, आनंद, सहकार्य आणि आपल्या आयुष्यात अनेक सुखकारक गोष्टी आणतात. दिवाळी, ख्रिसमस, होळी, ईद, गुरुपर्ब किंवा इतर कोणत्याही उत्सवादरम्यान जग स्वर्गासमान दिसते. मुले, प्रौढ, किशोरवयीन, वडीलधारे लोक या सर्वांच्या जीवनांत उत्सवाचे महत्त्व आहे.

प्रत्येक उत्सव जीवनाचे आणखी खोल धडे शिकवतात. प्रत्येक उत्सव काही महत्त्वाचे नैतिक मूल्य दर्शवितो. उत्सव साजरा करताना आपल्याला त्या महान व्यक्तिमत्त्वाची आठवण करून दिली जाते जी आपली नैतिक मूल्य मजबूत करतात. सणांबद्दलची सर्वात विलक्षण गोष्ट म्हणजे ते राष्ट्र, शेजारी आणि विविध समुदायांना एकत्र आणतात. ते संपूर्ण मानवजातीला आनंद आणि उत्सवांच्या आनंदी धाग्याने बांधतात.

परदेशात भारतीय सांस्कृतिक उत्सव उत्सुकतेने साजरा करतात. सण हे शांततेचाही प्रचार करतात. उत्सव जगाचे सौंदर्य आणि आत्मा आहेत.

कृष्णग सचिन पाटील

Exclusive Training In Kathak
at
ASMI Dance Academy

Curriculum Based Kathak
Certified by Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune

ASMI

Batches in Rochester Hills:
Tuesday to Friday
Time: 5:00 PM - 9:00 PM
Venue: 855, Dunedin Drive,
Rochester Hills, MI - 48309

Batches in Novi: Mondays
Time: 6:00 PM - 8:00 PM
Venue: Center for Performance Arts And Learning
28243 Beck Rd B2, Wixom, MI 48393

For Inquiries Contact:
Anagha Huprikar
248-701-5275/asmidanceacademy@gmail.com
Anagha's ASMI Dance Academy

स्नेहबंध

२० व्या शतकातली भूतान यात्रा

दर उन्हाळ्यात कुठल्यातरी नवीन प्रदेशात सहलीला जायचे असा आमचा कित्येक दिवसांचा खाक्या असायचा. यावर्षी फारश्या चर्चेत नसणाऱ्या, गर्दीपासून दूर अशा भूतानला जाण्याचा निर्धार केला. हवामान, प्रवासातील अडथळे, आणि संपूर्णपणे नवीन अश्या प्रदेशात काय अडचणी येतील याची कल्पना नसल्यामुळे मुलांना बरोबर घेण्याची योजना रद्द केली. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे बरोबर गरम कपडे घेण्याचे टाळावे तर भूतानमध्ये नेमके कसे हवामान आहे याची कल्पना नसल्यामुळे थोडे ओझे झाले तरी चालेल, पण गरम कपडे घेऊ या, असा निर्णय झाला.

भूतानला जाण्यासाठी दोन मार्ग उपलब्ध होते. त्या काळात विमान सेवा उपलब्ध नसल्यामुळे रेल्वे व बसचाच पर्याय होता. रेल्वेने कलकत्त्याला जायचे व तिथून पुढे बस अथवा रेल्वेने भूतान सरहद्दी-पर्यंत पोहोचायचे असे आम्ही मनोमन ठरविले आणि कलकत्ता गाठले. इथून पुढे सिलिगुडीला जाऊन तिथून जयगावमार्गे फुन्सलिंग या भारत- भूतान सरहद्दीवरील चेक पोस्टवर जाण्याकरता आम्ही कलकत्त्याहून सिलिगुडीला जाणारी बस घेतली, कारण रेल्वेने जाणे सोयीचे नव्हते. हिमालयाच्या पायथ्याशी वसलेले सिलिगुडी अत्यंत रमणीय शहर आहे. टॉय रेल्वेप्रमाणे छोटेखानी सिलिगुडी रेल्वेचे स्थानक फुन्सलिंगला जोडले गेले आहे सिलिगुडीला उतरताच हिमालयातील थंड हवेमुळे गरम कपडे काढावे लागले.

सिलिगुडी मिलिट्रीचे केंद्र असल्यामुळे मिलिट्रीची वाहने व फौजी जवानांचा बोलबाला अधिक आहे. जवळच बागडोगरा विमानतळावरून प्रामुख्याने मिलिट्रीच्या जवानांची धावपळ दिसून येते. बागडोगरा उत्तरेकडील बहुतेक विमानतळांशी जोडलेले आहे. अलिकडे बागडोगराहून भूतान मधील नंबर दोनचे शहर पारोला पोहोचणे शक्य झाले आहे. पारो शहर भारतातील गया, दिल्ली, गोहत्ती व कलकत्त्याशी जोडले गेले आहे, परंतु पूर्वी भूतान जगाच्या हवाई-नकाशावर नव्हते.

सिलिगुडीला दुपारी पोहोचल्यामुळे पुढे भुतानच्या सरहद्दीवर जाऊन फजिती करून घेण्यात काही अर्थ नव्हता, कारण फुन्सलिंगमध्ये थांबण्याकरिता हॉटेल अथवा धर्मशाळा असेलच याची खात्री नव्हती. तेव्हा सकाळीच उठून जयगाव किंवा हशिमाराकडे जाणारी रेल्वे पकडून उजेड असतानाच भूतान सरहद्दीवर पोहोचावे असा विचार करून एका छोटेखानी हॉटेलमध्ये थांबण्याचे ठरवले. सोय असण्यापेक्षा गैरसोयच जास्त असणारे ते हॉटेल होते.

सकाळी ११ वाजता हशीमारा स्टेशनवर पोहोचलो, तेथून बग्गीने फुन्सलिंगला असलेल्या चेकपोस्ट कार्यालयात दाखल झालो. या भागाला स्थानिक लोक "आखरी गांव "या नावाने देखील ओळखतात. बौद्ध संस्कृतीची छाप असलेले सरहद्दीवरील चेकपोस्ट कार्यालय लहान असले तरी वेगवेगळ्या रंगांनी रंगविले असल्यामुळे आकर्षक दिसत होते. त्यातच परिसरात गुलमोहोराची ३/४ झाडे लाल फुलांनी बहरल्यामुळे शोभून दिसत होती.

पासपोर्टवर आधारित भूतानमध्ये प्रवेश करण्याचा परवाना लगेचच मिळाला, त्याकरता किरकोळ फीस द्यावी लागली. आम्ही फक्त भूतानची राजधानी थिंपू येथेच जाणार असल्यामुळे भूतानच्या अंतर्गत भागात वेगळे फिरण्याच्या परवान्याची आम्हाला गरज नव्हती. थिम्पूला जाणारी शेवटची बस या चेक पोस्टवरून निघणार असल्यामुळे आम्ही बसथांब्यावर जाऊन थांबलो. अवती-भोवती हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या विहंगम दृश्याची लज्जत चाखीत होतो. सगळीकडे हिरव्यागार टेकड्या, टेकड्यांवर मधेच कुठेतरी असणाऱ्या दोन तीन घरांचा पुंजका, रानफुलांनी सावरलेली धरती, लांब कुठेतरी वाहणारा ओहोळ, उन्हाळा असून देखील गार वारा, सगळे काही स्वप्नवत होते. वस्ती कमी असल्यामुळे भयावहही होते. आमच्या बसमध्ये आम्हीच फक्त भारतीय होतो. बसक्या नाकाची, लाल-गोरेपान असणारी ठेंगणी मूर्ती असलेली ही मंडळी त्यांच्या स्थानिक भाषेत मोठ-मोठ्याने काय बोलत होती, याचे आकलन होणे कठीण होते. संध्याकाळी अंधार पडल्यावर बस थिम्पूला पोहोचली. कुठल्याही प्रकारचे आरक्षण नसल्यामुळे समोर दिसेल त्या हॉटेलमध्ये जायचे आणि स्वतःला सुरक्षित करून घ्यायचे हे महत्वाचे होते, कारण वेगळ्याच वाटणाऱ्या या लोकांमध्ये आम्हाला असुरक्षित वाटायला लागले.

जे हॉटेल गाठले ते हॉटेल नव्हतेच मुळी. ते एका स्थानिक भूतानीजचे घर होते, परंतु पर्यटकांना या हॉटेलवजा घरात एक खोली राखून ठेवण्यात आली होती. हॉटेलमध्ये शिरताच अलिबाबा आणि चाळीस चोर मधील ज्या व्यक्तीला छातीपर्यंत लोंबकाळणाऱ्या मिशा असतात, डोळे किलकिले असतात अश्या व्यक्तीसारखी एक व्यक्ती समोर आली आणि तुटक्या फुटक्या हिंदीमधून आम्हाला पर्यटकांच्या वहीत नोंद करायला सांगितले. त्या व्यक्तीकडे पाहून माझी तर अकारण पांचावर धारण बसली. शक्य तितक्या लवकर कसेबसे दोन घास पोटात घालून झोपी जावे असे ठरवून आम्ही रूममधे शिरलो. सामान ठेवत नाही तोच दारावर टकटक ऐकू आली. दरवाजा उघडताच समोर एक वयोवृद्ध, झगा सदृश कपडे घातलेली स्त्री आत आली आणि तिने खाण्याकरता काय हवे आहे ते विचारले. राईस आणि दाल यांचे नाव तिने घेतले, आम्ही तिला राईस आणि दाल आणायला सांगितले. बहुधा या वस्तू तयार नसाव्यात. खूप वेळाने त्या स्त्रीने पाण्याचा जग व खाण्याचे पदार्थ आणून टेबलावर ठेवले. दिवसभर सोबत आणलेल्या मराठमोळ्या फराळावर ताव मारल्यामुळे फारशी भूक नव्हती, आणि अर्धवट शिजवलेला, कदाचित सोडा जास्त असलेला भात आणि दाल फारसे चविष्ट नव्हते, भातापेक्षा दाल चांगली होती.

खाणे झाल्यावर लाईट बंद करून झोपलो. नाईट लॅम्प वैगेरे भानगडी या लोकांना माहीत नसाव्यात, म्हणून लाईट बंद करताच अंधार गुडूप झाला. परप्रांत, विचित्र लोक अश्या वातावरणात झोप तरी कशी येणार? पण एक शब्द न बोलता पडतो न पडतो तोच रूमच्या एका भिंतीवर बाहेरून कोणीतरी थाप मारीत असल्याचा आवाज आला. आवाज येत होता, बंद होत होता.

पुन्हा भिंतीवर थाप पडत होती. आवाज काही लहान नव्हता. त्यामुळे पुन्हा एकदा असुरक्षिततेचे वातावरण पसरले. पाहतो तर भिंत काच वजा धातूपासून बनवलेली आहे. लाईट लावून कश्याचा आवाज येतो हे पाहण्याची हिंमत नव्हती. जास्त जोराने बाहेरून थाप पडल्यास कदाचित भिंतीला छिद्र पडेल आणि बाहेरील संकट आत येऊ शकेल या भीतीने माझी झोप उडाली. थोड्या वेळाने पांघरूण सारून मी लाईट लावला आणि बाहेर काही दिसते का याचा अंदाज घेऊ लागलो. भिंतीवरील खिडकीमधून काही दिसत नव्हते कारण बाहेर अंधार गुडूप होता. शेवटी बॅगेतली बॅटरी काढून तिच्या प्रकाशझोतात डोकावून पाहिले अन पाहतो तर बाहेर दोन चांगले गलेलठ्ठ याक बांधलेले होते, तेच या भिंतीला अधून मधून धक्के देत होते

रात्री झोप व्यवस्थित न झाल्यामुळे सकाळी उठायला उशीर झाला. या दरम्यान रात्रीच्या त्या स्त्रीने दोन वेळा दरवाजा ठोठावल्याचे सांगितले. रात्रीच्या जेवणाचे पैसे आणि आत्ताच्या चहाच्या पैश्याची तिने मागणी केली. भारतीय चलन व भूतानी चलन यात विशेष तफावत नाही, भारतीय चलन भूतानी चालनापेक्षा थोडे महाग आहे याचा फायदा भूतानमध्ये सरसि घेतला जातो. हॉटेलच्या बाहेर पडताच आम्ही भूतानच्या राजवाड्यापासून फारच थोड्या अंतरावर आहोत हे लक्षात आले. राजवाड्याकडे जाणारा महामार्ग ऐसपैस होता पण त्यावर वर्दळ काहीच नव्हती. रस्त्याच्या कडेला एक म्हातारा मनुष्य टोपलीतील केळी विकत असताना तेवढा दिसला. त्याच्याकडून केळी घेतल्यावर आम्ही राजवाड्याच्या विरुद्ध दिशेला मुख्य रस्त्यावरून चालू लागलो. वर्दळ तर नव्हतीच. किरकोळ दोन चार माणसे रस्त्यावर दिसत होती. इतक्यात राजवाड्याकडे वेगाने जाणारी एक कार येताना दिसली, त्यासरशी आमच्या मागून येत असलेल्या माणसांनी घाईघाईने आमच्या माना धरल्या आणि त्या जमिनीकडे झुकवल्या, क्षणभर ते काय करीत आहेत हे आम्हाला कळेचना. कार निघून गेल्यावर त्यांच्यापैकी एकाने मोडक्या तोडक्या हिंदीत आम्हाला सांगितले की ती कार येथील राजाची होती, राजा जात असताना जनतेने मान खाली झुकवायची असते. आम्ही कुतूहलाने त्याला विचारले, "त्या कारमध्ये राजे होते काय?" उत्तरादाखल तो म्हणाला "ते मला सांगता यायचे नाही, पण कारवर लावलेला झेंडा त्याचे प्रतीक आहे."

स्नेहबंध

थिंपू शहर तसे छोटेखानी शहर आहे. कमालीची स्वच्छता असलेल्या या शहरात कुठेही सिग्नल लाईट नव्हते, आजही नाहीत. वर्दळीच्या ठिकाणी आकर्षक गणवेशातील पोलीस ट्रॅफिक आणि माणसांच्या येण्या-जाण्यावर नियंत्रण ठेवतात. आम्ही थोडे अंतर चालून गेल्यावर आम्हाला एके ठिकाणी बरीच गर्दी दिसली, चौकशी केल्यावर कळले की नॅशनल हेरिटेज म्युझियम पाहण्यासाठीची ही गर्दी आहे. क्यू वगैरे प्रकार नव्हता. आम्हीही त्या गर्दीत सामील झालो. त्या ठिकाणी बरेच भारतीय पर्यटक आले होते. मिलिट्रीचे लोकही पुष्कळ होते. मात्र ते सर्व भारतीय होते. याचे कारण विचारल्यावर असे समजले की भूतान हे भारत व चीन या देशांमधील बफर स्टेट आहे. भूतानच्या संरक्षणाची जबाबदारी भारतावर आहे म्हणून येथे भारतीय सैन्य कायमस्वरूपी असते. औरंगाबाद येथील श्री वैद्य येथे भेटले, ते येथे भारतीय सैन्यात कार्यरत आहेत असे त्यांनी सांगितले. जवळच भूतानच्या प्रसिद्ध हस्तकला प्रदर्शनात अनेकविध वस्तू विकण्यासाठी ठेवण्यात आल्या होत्या. त्यात प्रामुख्याने रॉ-सिल्क, विणलेल्या टोपल्या, मास्क्स, हॅण्डमेड पेपर, मेटल क्राफ्टचा समावेश होता. सध्याचे पर्यटनाचे मुख्य आकर्षण असलेला बुद्धिस्ट पॉईंटवरील बुद्धाचा बैठा पुतळा त्यावेळी नव्हता. ब्रॉन्झ धातूचा हा पुतळा शहराच्या बाहेर नव्याने उभारला आहे. ब्रॉन्झच्या या पुतळ्याला सोन्याचा मुलामा आहे. बैठ्या पुतळ्याची उंची ५२ मीटर आहे.

आज भूतान बरेच आधुनिक झाले आहे. थिम्पूची आजची लोकसंख्या एक लाख एवढी आहे. भुतानची लोकसंख्या आठ लाख आहे. थिंपू व्यतिरिक्त पारो व पुनाखा ही मोठी शहरे आहेत. पारो थिम्पूच्या दक्षिणेस तर पुनाखा थिम्पूच्या उत्तरपूर्वेस आहे. भारताच्या सरहद्दीपासून थिम्पूला जाण्यासाठी रोडने पाच तास लागतात, कारण रस्ता बेताचाच पण घाटाचा आहे. भूतानचे चलन Ni-Ngutrun हे रुपयांपेक्षा कमी किमतीचे आहे. सध्या प्रवास व हॉटेलची चोख व्यवस्था असल्यामुळे तीन दिवसात भुतान यात्रा पूर्ण होते. त्यात पर्यटक थिंपू, पारो व पुनाखा शहरांना भेट देऊ शकतात, बहुतेक ठिकाणी पायी चालत जाता येते. काही ठिकाणी माफक दरात टॅक्सी मिळतात. आता पारो हे शहर भूतान एअरवेजने व रशियन ऐअरवेजने जगाशी जोडले गेले आहे. निवांत, वर्दळीपासून दूर पर्यटनासाठी भुतान आजही उत्तम स्थळ आहे. भूतानचा "सुखी देशांत" बराच वरचा नंबर आहे.

दोन दिवसांची भूतान यात्रा संपवून आम्ही खाली उतरलो. रेल्वेने दरभंगा स्टेशनमार्गे थेट गोहत्ती गाठले. ब्रह्मपुत्रा, गोहत्ती येथील नवग्रह मंदिर, वॉर मेमोरियल आणि रिफायनरीज पाहिल्यानंतर आमचा परतीचा प्रवास सुरु झाला. ब्रह्मपुत्रेचे पात्र पाहून ब्रह्मपुत्रा नदीला नदी न म्हणता "नद" म्हणावे इतके मोठे पात्र या नदीचे आहे. गोहत्तीत जमीन सतत ओली असलेली दिसते, आम्ही एका स्थानिक माणसाला याचे कारण विचारले असता तो म्हणाला, "जमिनीत असलेल्या तेलामुळे (मिट्टी का तेल) जमीन सतत ओली दिसते". आंब्याचे दिवस असल्यामुळे दरभंगा स्टेशनवर इतक्या माशा होत्या की प्लॅटफॉर्म माश्यांनी झाकून गेला होता व काळाकुट्ट दिसत होता. मात्र "लिची "नावाचे गोड फळ येथे भरपूर प्रमाणात खायला मिळाले.

बाळकृष्ण पाडळकर

स्नेहबंध

शब्दशोध

व	चिं	र	के	श	व	सु	त	त्र	अ	इं	दि	रा	सं	त
पु	त्र्य	ण	बा	ग्रे	स	हा	वि	अ	रु	णा	ढे	रे	कं	व
का	खा	जि	सु	भ	पु	स	वृ	दा	ण	ना	थ	मा	ध	व
ळे	नो	त	रे	दे	बो	शि	वा	जी	सा	वं	त	जा	ठ	शी
पु	ल	दे	श	पां	डे	र	रे	सु	धू	व	द्र	मी	जो	क
बा	क	सा	भ	फा	र	व	क	गे	धां	रें	र	वि	र	जी
ल	र	ई	ट	क	ट	ळ	ग	र	न	शु	चिं	क	री	ए
क	ण	ना	र्ढे	विं	दा	क	रं	दी	क	र	ळ	ध	र	कु
वि	श्रा	म	बे	डे	क	र	ल	र	मा	गू	चौ	दा	बे	ल
ना	सी	दे	श्री	म	मा	टे	वा	क्ष्मी	ड	ई	म	सौ	टी	क
बा	कु	व	सं	त	बा	प	ट	मा	बा	ना	भा	पा	मि	र्णी
वा	सु	ढ	अ	मिं	या	त्रे	श	णा	इ	ई	स	रा	श	त्र
रा	मा	सा	नि	द	अ	टे	हि	सं	ई	श्वा	टि	री	तां	त
कां	ग्र	ळ	ल	के	क	ब	ना	क्र	वि	शु	गि	ळ	सं	बे
त	ज	र	प्र	व्यं	श	मं	गे	श	पा	ड	गा	व	क	र

वरील 'शब्दशोध' कोड्यात एकूण बेचाळीस मराठी लेखक, लेखिका, कवी, कवयित्री यांची नावे, टोपणनावे लपलेली आहेत. नावांच्या मध्ये असलेल्या मोकळ्या जागा वगळण्यात आल्या आहेत.

उदा. 'पु ल देशपांडे' हे नाव, पुलदेशपांडे असं शोधावं लागेल. कोड्याची उत्तरे इतरत्र.....
(या कोड्याविषयी काही सूचना, प्रतिक्रिया असतील, तर त्या आम्हाला जरूर कळवा)

संजय मेहेंदळे

॥ तेथे शब्दब्रम्ह कवळले ॥

Congratulations to MMD 2019 Committee for a great year!

Vinny's

Vinny's now serving desserts for your holiday parties

Free Delivery in Troy | Please order at least 48 hours in advance

Malai Kulfi: $1 Each

Mango Kulfi: $1.50 each

Pista Kulfi: $1.50 each

Order on email: troyvinnys@gmail.com

Half Tray Tiramisu: $30 (Serves approx. 20

Order over phone: (248) 550-3077

Half Tray Mango Mousse: $25
(Serves approx. 25)

Order via Facebook: https://www.facebook.com/VinnysTroy/

Authentic Indian Groceries, frozen foods, pickles.
Proudly serving the Indian community from 2 locations – Canton and Northville

Canton store:44266 Cherry Hill Rd Canton, MI 48187
Phone: 734-844-6702

Northville store - 16991 Ridge Rd,
Northville, MI 48168.
Phone - 248-773-7345

kw CENTRAL
KELLERWILLIAMS.
35427 Dodge Park Rd. Sterling Heights, MI 48312
SELL IN A FLASH, CALL KASH!

REALTOR®, KASHMIRA DESAI
YOUR METRO DETROIT EXPERT
View What is *ACTIVE, PENDING & SOLD* in your Neighborhood go to www.kashmira.kwrealty.com
Cell (248) 974 6979 Office (248) 655-7955
realtor.kashmira@gmail.com

Each Keller Williams Office is Independently Owned and Operated

Taal Academy

Learn the versatile
Indian Classical Kathak Dance
with renowned Kathak Dancer,
Manisha Dongre

Locations -

Monday to Saturday	Troy	Bharatiya Temple City style Tango studio
Sunday	Novi	Detroit India cultural center

Special Batches for Adults and Moms

248-740-5915
www.manishadongre.com
fb.me/taalkathak

प्रश्न

प्रश्न, प्रश्न तोच जुना
मग नव्याने का पडतो
मनात माझ्या विचारांचं
उगीच वादळ उठवून जातो

मन म्हणतं प्रत्येक प्रश्नाला
उत्तर मात्र नक्की असतं
मग किती शोध घेतला
म्हणजे ते हाती लागतं?

विचार जणू वाळूचा कण
म्हणता म्हणता निष्टून जातो
चंचलपणे क्षणार्धात
हळूच दुसऱ्याला खो देतो

कधी विचारांच्या भोवऱ्यातून
मिळालं उत्तर असं वाटतं
नक्की चूक का बरोबर
हे पक्कं माहित नसतं

मन खरं तर माझं ना?
पण विचार दुसऱ्याचा अधिक करतं
उत्तर शोधताना नकळत ते
आठवणींच्या चक्रात हरवतं

हरवतं का सहज रमतं
हे सुद्धा कळत नाही
प्रश्न नक्की काय होता
हेही क्वचित आठवत नाही

मग पुन्हा प्रश्न जुना
नव्याने पुन्हा पडतो
मनात माझ्या विचारांचं
उगीच वादळ उठवून जातो

पूनम तोरगल

With Best Compliments from

WE SELL MAC LLC

Rahul Korgavkar

www.wesellmac.me

We Buy, Sell, Refurbish & Repair
Apple Laptops, Towers

AND

DEE & ASSOCIATES

Precision Machining, Turning

Dee Korgavkar- President

(248) 703-1721

स्नेहबंध



(या शब्दकोड्याचे उत्तर अंकात इतरत्र.....)

या शब्दकोड्याविषयी काही प्रतिक्रिया, सूचना असतील, तर त्या आम्हाला जरूर कळवा!

संजय मेहेंदळे

स्नेहबंध

आडवे शब्द

१) आळंदी ३) लोकांच्यात चांगला बदल घडवणारे ५) वजनदार दागिने ८) घट्ट नसलेलं ९) शिवाजीराजांच्या स्वराज्याचे पहिले सेनापती ११) धनुर्धारी राम १२) बारा जुने व्यावसायिक १४) सरळ नसलेला १६) येथील किल्ला जिंकण्यासाठी चिमाजीअप्पांनी पराक्रमाची शर्थ केली १८) पावसाळ्यात ढगांचा आवाज २०) दिवाळीच्या फराळानंतर खावंसं वाटणारं २२) टिपेचा आवाज २३) कसलाही आकार नसलेला २४) डॉक्टरांना दूर ठेवण्यासाठी रोज खायचे फळ २५) वीराचे आभूषण २६) भारतीय ध्वजातील चिन्ह २७) दिवस मोठा करणारा, गोड बोलणारा सण २९) बिनकामाचा, अस्ताव्यस्त पसरलेला ३३) सगळेच मित्र! कोणीही वैरी नाही.... ३६) खूप उंचावरील पराक्रमी ३७) याच्या साहाय्याने भिंतीतून पलीकडे जात येते ३९) .....म्हणजे नक्की चौदा कि पंधरा दिवस??? ४०) स्थावर मालमत्ता ४२) तीन वैदिक ग्रंथांपैकी एक ४३) बाहेरच्या तापमानाशी फटकून असलेले

उभे शब्द

१) अवाढव्य २) शाश्वत ३) बारीक ४) पूर्वी हे लावून दार बंद करत ५) बंदिवान ६) चारचौघांची वागायची पद्धत ७) एक बंगाली मिठाई १०) द्रौपदी स्वयंवराच्यावेळी अर्जुनाने केला १३) शेतीला पाणी द्यायचं चक्र १५) कर्णाची जन्मजात आभूषणं १७) अभिनेत्री नूतनचा एक सिनेमा १८) भीतीने पुरुषांचीसुद्धा ही अवस्था होते १९) सामान्य माणसाच्या हक्काची पंचवार्षिक आठवण २०) कधी वर कधी खाली २१) विचित्र २२) प्रशंसा २३) वाकलेला २४) पहाटेची साफसफाई २६) आर्थिक गैरव्यवहार २७) मोठा हिंदुस्थान २८) वृद्ध नसलेला मार्ग ३०) श्रीकृष्णाचा नातू ३१) सापासारखी भाजी ३२) चौदा रत्न मिळवण्यासाठी केलेला खटाटोप ३३) लांब हात असलेला ३४) भीष्माचार्य पहुडले होते ३५) आधी ठरवल्याप्रमाणे ३६) हवामानखात्याचा कारभार ३८) पराधीनता ४१) सौंदर्य, रूप

"Thanks to Maya Prep I earned a perfect composite score on my ACT in addition to scoring in the top 95% on the SAT!"

- Smit, Harvard University

Welcome to Maya Prep

Applications to America's Colleges and Universities continue to increase every year leading admission rates to shrink. To manage the vast number of applications, schools commonly rely on standardized test scores as a way to screen students.

The SAT and ACT will be two of the most important tests of your educational career.

There are many resources available to all students to prepare for the SAT, ACT, and the PSAT. However to stand out, to truly stand out, you need a mentor and a coach with the skills and expertise and instill in you the strategies, discipline, and rigor required to maximize your potential on test day.

Goals of the Maya Prep program include getting our students admitted to schools and programs of their choice and maximize scholarships.

It is difficult to prepare for the test, the good news is you don't have to do it alone...

The Maya Prep Advantage

- Average SAT Composite Score **improvement of 200 points**
- Average ACT Composite Score **improvement of 4 points**
- Many of our PSAT students have been awarded the $2,500 National Merit scholarship. This scholarship is awarded only to 2,500 students out of about 1.5M applicants.
- More than 100 students with an ACT Composite score of 33 or above (**99 percentile**) including 34, 35, and 36 out of 36. Average composite score of 30 (**96 percentile**)
- Students admitted to **top schools** including **Harvard, Columbia, MIT, CalTech, University of Michigan, Northwestern, Cornell, UC Berkeley, Notre Dame, Michigan State University, Wayne State, Purdue, University of Virginia, University of Chicago**, and many more!

What We Offer

- Proven Results
- Qualified Instructors
- Test-Driven Training
- Regularly Graded Homework
- Face-to-Face Classes and Remote Capabilities
- Customized Classes
- Admission Counseling
- Essay Assistance
- In-person/Remote Conferences with Students and Parents
- Specially Crafted Study Material

About Us

- Motivational teachers with MBAs (Ross School of Business, University of Michigan) with a combined 20+ years of successful teaching experience

Contact Us

Maya Prep
30368 Norwich Dr.
Novi, MI 48377
(248) 231-4562
info@mayaconsultants.com

www.mayaprep.com

पुष्करचा संभ्रम आणि नवी सुरुवात

मराठी मंडळाच्या कार्यक्रमात "ने मजसी ने परत मातृभूमीला.. सागरा प्राण तळमळला" कानी आले आणि पुष्करच्या अंगावर नकळत शहारे आले. कदाचित त्या सभागृहातील प्रत्येकजणच हे गाणे ऐकून भावुक झालेला होता. स्वदेशापासून, स्वगृहापासून, स्वकीयांपासून शेकडो मैल दूर, शिक्षणाच्या निमित्ताने, नोकरीच्या निमित्ताने, विवाह संबंधांच्या गाठींपायी वा आणखी काही कारणांनी अमेरिकेत आलेल्या प्रत्येकाची नाळ मात्र अजूनही स्वदेशाशी जोडलेली होती, कळत वा नकळत.

कार्यक्रम संपताच "मी जाणार आहे परत भारतात" पुष्कर स्वतःशीच म्हणाला. असे आधीपण कितीदातरी घडले होते. अनेकदा भारतात परत जाण्याचा विचार पुष्करच्या मनात आला होता, प्रसंगानुसार त्याची तीव्रता कमी-अधिक झाली असेल एवढेच.

अकरा वर्षे झाली, दिवाळी-दसरा मित्रांसोबत साजरे करताना मातृभूमीची आठवण येत असे, १५ ऑगस्ट - २६ जानेवारीला देशप्रेम नयनांना पाणीदार करत असे, कुठे भारतीय समुदायाचा काही कार्यक्रम वा मंडळाचा कोणता प्रोग्रॅम उत्साहाने साजरा करतांना सुद्धा 'भारतात होतो तेव्हा असा साजरा करत असूं' असे विचार मनात येत. क्षण सुखाचे असो वा दुःखाचे, उमेदेचेअसो वा निराशेचे, भावनांच्या प्रत्येक हिंदोळ्यावर भारतभूमीची, स्वकीयांची आठवण नेहमीच घुटमळत असे. मग कधी अचानक "मी भारतात जाणार" हा विचाररूपी उद्रेक मनात होई आणि काही काळात तरंग पाण्यातच विरावेत, तसा विरून जाई.

११ वर्षांपूर्वी पुष्कर अमेरिकेला आला तेव्हा त्याचा 'भारतात परत जाणार' हा निर्धार ही एका काळ्या दगडावरची पांढरी रेघ होती... "नक्की येणारच गं भारतात", असे आईला सांगून तो निघाला होता. जशी जशी या देशात वर्षे सरली, ती रेघही फिकट होत गेली. ११ वर्षांपूर्वी पुष्कर जेव्हा अमेरिकेत आला, तेव्हा येथील स्वच्छ शहरे, आरश्यासारखे गुळगुळीत रस्ते, त्यावर नियम पाळत पळणाऱ्या गाड्या ह्या सर्व गोष्टी त्याच्या मनाला भुरळ पाडत होत्या... आणि हे सर्व तरी ठीक पण सरकारी कार्यालयात, बँकांमध्ये, लहान-मोठ्या दुकानात 'चक्क हसत-हसत स्वागत करणारे लोक' केवळ आश्चर्य-कारकच नव्हते तर आश्चर्याचा धक्का देणारे होते.

एकीकडे सदैव खड्डा-ग्रस्त रस्ते, स्वतःच स्वतःचे नियम बनवून ज्याला जसे जावे वाटेल तसे चालणारी रहदारी आणि नेहमी रागात खेकसणारे लोक या आठवणींची शिदोरी घेऊन आलेल्या पुष्करला, अमेरिकेत आल्यावर आश्चर्याचा धक्का बसणे साहजिकच होते.

बघता बघता वर्षे सरली; दूरपर्यंत पसरलेली हिरवीगार झाडी, हिवाळ्यात उडणारा पांढराशुभ्र भुसभुशीत हिम, उंच उंच इमारतींची चकचकीत शहरे, वायुवेगाने दौडणाऱ्या नवनवीन गाड्या ह्या साऱ्यांची नवलाई हळूहळू फिकट झाली. पण त्याचसोबत "भारतात परत जायचं?", पुष्करच्या निर्धाराने मात्र आता प्रश्नार्थक चिन्ह धारण केले. त्याच्या नकळतच, त्याच्या मनात कधी, "भारतात किती जातीयवाद आहे", तर कधी "bureaucracy terrible आहे तिथे", कधी "ज्ञानाला आणि शिक्षणाला किंमत नाही तिथे", तर कधी "privacy हा प्रकारचं नाहीए भारतात" आणि कधी "नुसती ट्रॅफिक आणि धूळ! लोक कसे जगतात तेच कळत नाही" अश्या विचारांची पालवी फुटली होती. हे विचार म्हणजे भारत विरोध किंवा भारत द्वेष नव्हता, पण जगातील इतर देश, इतर समाज यांचा अनुभव घेतल्यानंतर मिळालेला नवा चष्मा होता. विरोधाभास असा की, जशी जशी घड्यातली वाळू सरकत होती तशी तशी एकीकडे भारतात परत जाण्याची मनिषा ढिली पडत होती तर दुसरीकडे 'टाइम्स ऑफ इंडिया', 'इंडियन एक्सप्रेस' अशा वर्तमानपात्रांची online surfing मात्र वाढत होती. तो भारतात होता तेव्हा हे राजकरण, निवडणूका हा सर्व बोगस प्रकार आहेत असा विचार करणाऱ्या पुष्करला, गेल्या काही वर्षात मात्र भारतात कोणाचे सरकार बनणार, तिथे कोणती नवी योजना आली आहे, नोटबंदी चांगली कि वाईट, इत्यादी विषय मनाला जास्त तीव्रतेने महत्वाचे वाटत होते. एकीकडे "US च work culture किती छान आहे, भारतात म्हणजे work-life balance च नाही" असे विचार तर दुसरीकडे "महाराष्ट्र मंडळाच्या मराठमोळ्या cultural activities मध्ये भाग घेतल्यामुळे रोजच्या monotonous life मध्ये रंग भरले जातात" हे विचार.

तरीही 'भारतात नक्की जाणार!' ही त्याची घोषणा अजूनही त्याच्या स्वतःसाठीच मांडलेल्या घोषणापत्रात वेळोवेळी हजेरी लावत असे. वेळ मिळाला की, कुण्या भारतीय संस्थेसाठी volunteer करणे, भारतात पूर/भूकंप यासारख्या घटना घडल्या तर हिरीरीने पुढाकार घेऊन donation campaign चालवणे, कुठे हिंदी-मराठी साहित्याचे मंडळ चालवणे इत्यादीमध्ये त्याचा सहभागसुद्धा हळू हळू वाढला होता. पण 'काय, भारतात येणार की राहणार तिकडेच?' हा भारतातील मित्रांचा वा आप्तांचा प्रश्न मात्र पुष्करला आता कटकटीचा वाटत होता. पुष्करला कदाचित जाणीव नसावी, पण त्याच्या मनातील संभ्रम लपणारा नव्हता. अमेरिकेत इतके वर्षे राहूनही एकीकडे त्याने 'भारतपण नीटनेटका, प्रगत राष्ट्र नक्की होईल' असे स्वप्न बऱ्याचदा मिटलेल्या आणि उघड्या नयनांनी बघितले तर दुसरीकडे 'खरंच कठीण आहे काही बदलणं भारतात. परत जाणं म्हणजे पायावर धोंडा मारून घेण्यासारखं आहे' असाही विचार त्याचा मनात वास करून गेला. विचार कोणताही असो, पण या साऱ्या भावना, सारे विचार, आणि कार्य यांची गोळाबेरीज केली तर इथे US मध्ये वास्तव्य करून पुष्करची भारतासोबतची दुरी वाढत होती की कमी होत होती हे सांगणे कठीण होते.

आज पुन्हा "ने मजसी ने..." ऐकले आणि वर वर शांत दिसणारा डोह परत घुसळून निघाला. ही सावरकरांच्या लेखणीची ताकद होती की काल रात्री 'स्वदेस' सिनेमा पहिल्याचा परिणाम होता का काही जास्त गंभीर, हे सांगणे कठीण. पण आजचे पुष्करच्या चेहऱ्यावरील भाव निराळेच होते.

"मेघ नभात जरी गेले, अन स्वर्गात मौजेने फिरले
परी होता भूमातेची आठवण, क्षणात द्रवित ते झाले"

कुण्या कवीची कविता स्वतःशीच पुष्कर पुटपुटला. आज त्याच्या पुटपुटण्यातही गांभीर्य होते. इतक्या वर्षांचा संभ्रम कदाचित संपला होता. आज त्याने भारतात परत जाण्याचा निर्णय घेतला होता. पण भारतात जाऊन करायचं काय हा प्रश्न होताच. 'वाहत्या जलधारेला मार्ग शोधणे कठीण नसते' भारतातून अमेरिकेसाठी निघताना बाबांनी दिलेला मंत्र पुष्करच्या कानात अजूनही घुमत होता. '

Our society has myriads of problems to solve. With our education and experience we should solve at least one', एका professor ने पुष्करला दिलेला हा विचार पुष्कारच्या मनात कोरला गेला होता. ठरलं...! भारतात जाऊन startup करायची. उद्योजक व्हावे हे पण पुष्करचे अधुरे स्वप्न होते. कदाचित त्याच्या अनेक अधुऱ्या स्वप्नांची सांगड झाली, संभ्रम तुटला आणि पुष्करने हा निर्णय घेतला.

पुष्करची गोष्ट अजून अधुरी आहे. उद्योगधंद्याचं अ-ब-क माहीत नसणाऱ्या मराठमोळ्या घरातून आलेल्या पुष्करचे startupचे स्वप्न पूर्ण होईल की नाही ह्याचा उलगडा भविष्यचं करेल. पण भारतातील एकंदर वातावरणात नव-उद्योग (startups) बद्दल खूप उत्साह आहे. विशेष म्हणजे भारत सरकार किती प्रोत्साहन देत आहे startups सुरु करण्यासाठी. आपल्यामध्येही कितीतरी पुष्कर आहेत जे संभ्रमात असावेत. द्विधा मनस्थिती केवळ भारतात परत जाण्याबद्दल नसून, उद्योग सुरु करू का, career field मध्ये बदल करावा का अशी बरीच दबलेली स्वप्ने कित्येकांच्या मनात असावीत. तर त्याच वेळी गेल्या काही दशकात, धाडसी निर्णय घेऊन यशस्वी झालेल्या मराठमोळ्या उद्योजकांची, विविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतलेल्या मराठी जनांची जागतिक पातळीवर एक फळी निर्माण झाली आहे. त्यांचे अनुभव, मार्गदर्शन पुष्कर सारख्यांचा संभ्रम दूर करण्यास मदतीचे ठरू शकतील. हे communication channels प्रस्थापित करण्यात महाराष्ट्र मंडळ महत्वाची भूमिका बजावू शकते असे मला वाटते.

- ऋतूज देशपांडे

स्नेहबंध

शब्दशोध

पु ल देशपांडे
सुहास शिरवळकर
रणजित देसाई
नामदेव ढसाळ
विश्राम बेडेकर
विंदा करंदीकर
शिवाजी सावंत
वि दा सावरकर
व्यंकटेश माडगूळकर
वसंत बापट
सुरेश भट
अरुण साधू
दया पवार
लक्ष्मीबाई टिळक
मंगेश पाडगावकर
बालकवी
बा सी मर्ढेकर
बहिणाबाई चौधरी
ना सं इनामदार
पु शि रेगे
प्र के अत्रे

बा भ बोरकर
चिं त्र्य खानोलकर
केशवसुत
अरुणा ढेरे
व पु काळे
कुसुमाग्रज
वा रा कांत
श्री म माटे
गदीमा
अनिल
नाथमाधव
नरेंद्र जाधव
इंदिरा संत
ग्रेस
विश्वास पाटील
जी ए कुलकर्णी
भा रा तांबे
चिं वि जोशी
गिरीश
सौमित्र
सुधांशु

With Best Compliments from

Shri & Shashi Thanedar

स्नेहबंध

गाठ

यंदाचं वर्ष हे मिर्जा गालिब यांचं १५०व्या पुण्यतिथीचं वर्ष. कालिदासाला जसे संस्कृत भाषेचा 'महाकवी' म्हणतात तसेच उर्दू भाषेत कदाचित गालिबचं स्थान आहे. गालिबचा एक सुंदर शेर आहे "मत पूछ के क्या हाल है मेरा तेरे पीछे, तू देख के क्या रंग है तेरा मेरे आगे". याचं रुपांतर करताना सहज, एक पूर्ण गजलवजा कविता मला सुचली, ती अशी

या अल्याड मी उभा, त्या पल्याड तू उभी,
उंबरा पाहे उभारू, ढाळणाऱ्या चौकटी,

पुसू नकोस मी कसा, राहिलो तुझियाविना
बघ जरा स्वतःस तू, आहेस कशी माझ्याविना

एकमेका विचारण्याचे, प्रश्न गे उरले किती
काय असतील उत्तरे? वाटे ती मना भीती

पापण्यांनीच दे निरोप, शब्द राहूदे मुकेच
थरथर ओठावरी तव, सांगते आहे बरेच

गाठ घडली, योग होता, आणखी काही नव्हे
पाऊले वळता उडाले, अंगणातील बघ थवे

सुरेश नायर

With Best
Compliments from

Pradeep Kokate

स्वकमाई...

बघता बघता तेवीस वर्ष झाली अमेरिकेत येऊन....! इकडे नवीन असताना ऑफिस मधल्या एका अमेरिकन जोडप्याशी ओळख झाली, मैत्री वाढली. एका संध्याकाळी आम्ही सगळे बाहेर फिरायला गेलो असतांना, त्या मित्राच्या बायकोने सांगितलं की I buy groceries and he takes care of the bills... अर्थात माझ्या "स्वदेशी" कानांना ह्या सगळ्या प्रकाराची अजून सवय झाली नसल्याने, मला हा प्रकार पचनी पडायला थोडासा वेळ लागला होता. वर्षामागून वर्षे भराभर सरली. पुढे आम्ही उभयता पण घर संसार- मुलंबाळं आणि आपापल्या व्यापात रमलो. कालपरत्वे, ह्या अमेरिकन जीवनाची सवय तर झालीच आणि इथल्या सगळ्या पद्धती हळुहळू अंगवळणी पडल्या. असो.

खरं तर ह्या देशात मुलं-मुली तरुण वयातच स्वतंत्र होऊन, घराबाहेर पडून आपल्या अश्या वेगळ्याच विश्वात रमतात. स्वतःच्या सर्व आर्थिक, सामाजिक जबाबदाऱ्या स्वतःच पेलायला सज्ज होतात. हा एक काहीसा आवडलेला, तेवढाच काहीसा न रुचलेला अमेरिकन संस्कृतीचा एक अतिशय महत्वाचा पैलू...! कधी कौटुंबिक परिस्थितीमुळे तर कधी आपल्या आर्थिक जबाबदाऱ्यांची ओळख व्हावी म्हणून असेल कदाचित. घराबाहेरच्या दुनियेशी संपर्क, व्यावसायिक शिस्तीचे पालन ह्या महत्त्वाच्या गोष्टी ही मुलं खूप लवकर शिकतात, हे मात्र नक्की. ही एक खूप मोठी जमेची बाजू आहे असं मला खूप मनापासून वाटतं. पण इथली एकंदरीत स्वैर जीवनशैली, घटस्फोटांचे वाढतं प्रमाण, विवाहबंधना विषयीच्या काहीश्या वेगळ्या कल्पना, ह्या सगळ्याचे पडसाद भावी पिढीवर नक्कीच उमटतात, परिणामी योग्य अश्या मार्गदर्शनाअभावी ही तरुण पिढी, ह्या सगळ्या सांसारिक रगाड्यात नक्कीच भरडली जाते. म्हणून म्हटलं मला काही अंशी न रुचलेला....! हा एक गहन आणि खूप मोठा वादाचा मुद्दा आहे, त्याविषयी नंतर कधीतरी ...असो.

अमेरिकेत जन्मलेली, वाढलेली आज आमची मुलंदेखील म्हणजे कन्यारत्न कॉलेजच्या दुसऱ्या वर्षात आहे. चिरंजीव शाळा, हायस्कूल संपवून आता कॉलेजला जायच्या तयारीत आहेत. त्यामुळे नुकत्याच संपलेल्या उन्हाळ्याच्या सुट्टीत "Summer Jobs" करणं हे ओघाओघाने आलंच. यंदाच्या उन्हाळ्याच्या सुट्टीत आमच्या दोन्ही मुलांनी, त्यांच्या आयुष्यातले पहिले "Summer jobs" केले. त्यांच्या तोंडून पे-चेक, ट्रॅफिक जॅम वगैरे शब्द ऐकून खूप मजा वाटली, अभिमान वाटला आणि एक वेगळ्याच प्रकारचं दडपणही आलं. अगदी काल परवा पर्यंत आपल्यावर सर्वस्वी अवलंबून असणारी ही पाखरं, आता एकाएकी बँक बॅलन्स, क्रेडीट कार्ड, इन्शुरन्स आणि गॅस प्राईसच्या गप्पा मारायला लागली आणि अगदी प्रकर्षाने जाणवलं की भूमिका बदलत आहेत, पण त्यात वेगळी मजा आहे... समाधान आहे!

आपल्या दीड-दोन महिन्यांच्या छोट्याश्या का होईना, पण "पहिल्या-वहिल्या" स्वकमाईतून आम्हाला दिलेली पहिल्या नोकरीच्या पहिल्या पगाराची डिनर-पार्टी, आमच्या वाढदिवसादिवशी स्वतःहून आणलेल्या यथा-शक्ती "भेटवस्तू", आपल्या लाडक्या, छोट्या दोस्ताला आणि त्यांच्या लहानग्या मैत्रिणीला त्यांच्या वाढदिसानिमित्त दिलेली छोटीशी "Ice Cream" पार्टी... या सगळ्यात एक वेगळाच आनंद आहे. आणि अगदी प्रकर्षाने जाणवलं, भूमिका बदलत आहेत आणि त्यात वेगळी मजा आहे... भूमिका बदलल्याचं अप्रूप आहे!

स्नेहबंध

आता नवीन जॉब, नवीन गोष्टी शिकणं, ठरल्या वेळात सगळी कामं पटापट उरकण हे दिवसभर चालू होतंच. आणि मजा म्हणजे दर आठवड्याला गाडीत गॅस भरताना, संध्याकाळी त्यांच्या ह्या नवीन ऑफिसमधून दमुन भागून घरी परतल्या-वर स्वतः किचनमध्ये किंवा यार्डवर्कमध्ये हातभार लावतानाच्या टंगळ मंगळीने प्रसंगी चांगलच डोकं फिरलं पण ही लुटूपुटूची प्रासंगिक वादावादी पण सुखावून गेली. आपल्या आई-वडिलांची रोजची होणारी कामाची धावपळ, आता ते स्वतः अनुभवत होतें. असो. एकीकडे डिझाइनर आणि ब्रँडेड गोष्टींच्या मायावी दुनियेत हरवलेल्या ह्या तरुण पिढीला, स्वकमाईतला थोड्या हिश्याची बचत करण्याचे फंडे देतांना, त्यांच्या असंख्य... Why? च्या प्रश्नांची उत्तरं देता देता झालेल्या दमछाकीत, एक वेगळीच मजा आहे.... भूमिका बदलल्याचं अप्रूप आहे!

तर मंडळी, विधात्याने ह्या पिल्लांच्या ताटात काय वाढून ठेवलं आहे, माहित नाही पण जे काही असेल ते सहन करायची शक्ती दे. प्रगतीचे पंख फैलावत, आकाशात उंच भरारी मारण्यास उत्सुक असलेल्या ह्या पिल्लांच्या पंखात बळ दे, देवाकडे अशी प्रार्थना जगातल्या प्रत्येक पालकांची असते....आमचीही आहे.

अशा माझ्या अमेरिकेत, भूमिका बदलण्याबद्दल यापूर्वी अनेकदा वाचनात आलं होतं पण आता प्रत्यक्षात अनुभवायची मजा काही औरच आहे....!

सरोज प्रशांत जावकर

स्नेहबंध

छंद मराठी बंध मराठी

"सूर्य म्हणजे ना, तो एक अग्नीचा गोळा असतो."
"हो? 'अग्नी'चा? बापरे!"
"होऽ"
माझ्या स्वरातलं आश्चर्य लक्षात न येऊन लेकीनं जोरदार होकार भरला.
"पण तू ते इंग्रजीत कसं सांगितलंस शाळेत? म्हणजे 'अग्नीचा गोळा' हा शब्दप्रयोग तू इंग्रजीत कसा व्यक्त केलास?" (अचंबित) मी प्रश्न टाकला.
"अं... Sun is like a fire ball... असं सांगितलं मी"... एरवी मराठीचा आग्रह धरणारी आई आज चक्क इंग्रजीत सांगायला का सांगतेय असं वाटून खांदे उडवत लेक म्हणाली.
आज काय खास? काय शिकवलं बाईंनी वर्गात? संध्याकाळच्या स्वयंपाकासोबत ओट्याशी नेहमीसारख्या आमच्या गप्पा चालतात. कधी शाळेतून कार्यानुभव, कला, चित्रकाम अशा वस्तू घरी येत असतात. अशीच एका संध्याकाळची गोष्ट. संत व्हॅलेंटाईन दिनाच्या निमित्ताने घरी आलेल्या दप्तरातून, पोतडीतून खजिना काढावा अशा थाटात एकेक गोष्टी बाहेर निघत होत्या. त्यात साध्या फुलीच्या (x) आकारावर सजावटीच्या फितींनी कपडे आणि वर काळ्या कपट्या लावून केस अशी कागदी सुबक बाहुली बनवलेली होती.
"अय्या, छान आहे? आणि हे काय घातलंय तिने अंगात?"
मोठी झटकन म्हणाली, 'परकर पोलकं' आणि धाकटीला त्यात दिसली 'साडी'!
फ्रॉक वा झगा सोडून या भातुकलीवयीन दोन ठक्या बाहुलीला परकर पोलकं वा (तयार 'कल्पना') साडी नेसवून आपल्याच विश्वात हरवलेल्या होत्या!

"इंजिनदादा, इंजिनदादा काय करता? कोळसाय मी खातो, पाणी मी पितो, गावाला जातो नव्या नव्या... हैऽ..." असं जोशात गाणं गाणाऱ्या आमच्या शेंडेफळाचा एका रविवारी कशावरून तरी ताल गेला होता आणि जोरदार आरडाओरडा, गंगाजमुनांसकट प्रसंग रंगला होता. सकाळच्या स्काईपवर ठसक्यात सांगून टाकलं, "आजी, आपल्या ढमूबाईचं र-ण-कं-द-न चालूये, हे बघ!" शाळेतल्या प्रोजेक्टवर What we eat सदरात पिझ्झे वा कूकीज सोडून या आमच्या ताईने फक्त डोसा काढून रंगवला नव्हता तर त्या सोबत चटण्या आणि सांबार ही दाखवलं होतं. वीस-बावीसात, काही देशी मुलं असलेल्या त्या वर्गाच्या दारावर हा प्रातिनिधिक अस्सल भारतीय डोसा बघायला गंमत आली खरी! 'गणपती बाप्पा मोरया' वा 'शिवाजी महाराज की जय' याला आमच्याकडे काय जोश असतो, येऊन बघाच.

Sunday	रविवार	ravi-vaar
Monday	रविवार	som-vaar
Tuesday	मंगलवार	mangal-vaar
Wednesday	बुधवार	budh-vaar
Thursday	गुरुवार	guru-vaar
Friday	शुक्रवार	sukr-vaar
Saturday	शनिवार	shni-vaar

शब्द, भाषा, पेहेराव, खानपान, सण, परंपरा, संस्कार, भूगोल, इतिहास याबरोबर आजचा बदलता काळ, आणि या सगळ्याची नैमित्तिक दिनक्रमाशी सांगड या बहूअंगांनी संस्कृती नामक रोपटं अमेरिकेत चिमुकल्यांमध्ये पुरेपूर रुजवायचं हे कठीण तर कधी कधी अशक्य वाटतं. खरं तर आमच्या घरच्या मराठी प्रयोगशाळेत हे आजमावून बघणं चालू असताना माझा मनाशीच विचार चालू असतो. सुदैवाने मागच्या ५-६ वर्षात तीनेकवेळा माझ्या मुलींना घेऊन मी दोन अधिक महिन्यांचे वास्तव्य भारतात करून आले. हौसेखातर माहेरी शाळेच्या बालवाडीत माझ्या छोट्या मुलींना दीड-दोन महिन्यांसाठी घातले होते. तिथली बालवाडी ती ही जेमतेम ३-४ तासाची.

त्यासाठी सकाळी उठून आवरा, त्यांचे डबे, मग दोघींना शिशु गट, मोठा गट अशा दोन शाळेत पोहोचावा आणि घरी येऊन टेकले की लगेच पुन्हा न्यायला जा, ही उठाठेवच झाली होती. त्या श्रमाचं मोल मात्र इकडे आल्यावर प्रकर्षानं लक्षात आलं. ती काही तास-दिवसांची पुंजी इथे दोन वर्षांच्यावर कामाला आली. आजरोजी खात्रीनं म्हणावंसं वाटतं की, इथे उल्लेख केलेल्या आमच्याकडच्या काही गंमतीजंमती आणि मुलींमध्ये मराठीपण चांगलं रुजणं, यात त्या मोजक्या बालवाडीच्या दिवसांची मोलाची भर ठरली आहे.

जगभरात भारताबाहेर जन्मलेल्या मुलांची मातृभूमीशी ओळख व्हावी या हेतूने अनिवासी विद्यार्थ्यांचं एखादं उन्हाळी संमेलन महाराष्ट्रात आयोजित केलं जावं, या विचाराने २०१२ साली 'ज्ञान प्रबोधिनी हराळी समर कॅम्प' नावाचा उपक्रम केला गेला होता. साहस, शिक्षण, नाविन्य, भारतीय जीवनशैली, करमणूक, भरतकाम, विणकाम, नृत्यादि कला यांनी परिपूर्ण असा १० दिवसांचा भरगच्च कार्यक्रम धाराशिव जिल्ह्यातल्या छोट्या गावात रंगला होता या शिबिराच्या निमित्ताने. परदेशात वाढणाऱ्या मुलांची शालेय वर्षे हळूहळू व्यस्त होऊ लागली की, सुट्ट्या काढून भारतातल्या एखाद्या शिबिराला नियमित जाणं तसं अवघड. त्यात जेमतेम २-३ आठवड्यांची भारतवारी. जेटलॅग, नातलग, कामे उरकायची; त्यात मुलांना आडगावात शिबिराला कुठे सोडणार?... असे बरेच अडसर. मग मुलांना, पालकांना प्रवृत्त करण्यासाठी बीएमएममार्फत विशेष प्राविण्य शिष्यवृत्ती यात अशा शिबिराचा समावेश करता येईल का?

'इच्छा तिथे मार्ग'... असं म्हटलं जातं. समजा, असं केलं तर... अमेरिकेतली मराठी मुलं जेव्हा त्यांच्या आजोळी, आई बाबांबरोबर जितके काही दिवस भारतात-महाराष्ट्रात जातील, तिथे, त्या त्या परिसरात ज्या मराठी शाळा आहेत, त्यांनी पूर्वपरवानगीने सुट्टीवर येणाऱ्या अनिवासी मुलांना शाळेत हंगामी प्रवेश दिला तर? म्हणजे कुठे दूर ठराविक ठिकाणी जाण्याची गरज नाही, दिवसांचे बंधन वा इतर दडपण नाही. या अनिवासी मुलांनी वर्गात जे चालले आहे ते समजून घ्यायचे, शाळेचा परिसर, नवीन मित्रमैत्रिणी, भारतीय शिक्षणपद्धती यांचा अनुभव घ्यायचा, अगदी निसंकोच, आवड नावडीसकट. महाराष्ट्रातल्या मुलांनाही कुतूहल असतेच. दोस्तीतून खूप काही शिकतील मुलं. शाळेतले उपक्रम, कथाकथन, वाचनालये, स्नेहसंमेलनं, सहली असं खूप काही! पुढे पत्रमैत्री, संपर्क यातून ही नाती आणखी विणली तर मराठी भाषेतून एकमेकांना जोडणारा एक बंधच तयार होईल आपसूक. हा बंध वाढला तर नियमित शिबीरेही घडतील. आज अमेरिकेतही बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या पुढाकाराने स्थानिक मंडळातून अनेक ठिकाणी मराठी शाळां-सारखे स्तुत्य उपक्रम चालू आहेत. महाराष्ट्रातच मराठीच्या बाबतीत उदासीन असलेल्यांना यानिमित्ताने सहजतेने जाग आणता येईल. त्या कोवळ्या वयातल्या मुलांमध्ये एक भावनिक, वैचारिक आणि सांस्कृतिक देवाणघेवाण तर होईलच पण त्यातून कुटुंबांना जोडणारा जणू बांध तयार होईल. त्यायोगे शिक्षणासारख्या कार्याला आवश्यक ती मदत करण्याचे देशाचे सीमोल्लंघन करून दूरदेशी आलेल्या पालकांना यानिमित्ताने पुढच्या पिढीला भविष्यात मातृभूमीशी नाळ घट्ट करण्यात या मोहिमेतून मोलाचा हातभार लागेल. आताच डॅलस इथे झालेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाच्या घोषवाक्यावर आधारित म्हणूया...

सूर गुंजती मनी मराठीचे
फुलवित नाते मायबोलीचे...

जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तरी गर्वाने 'आम्ही मराठी' हा भाव, विचार आणि भाषा संस्कृतीची जपणूक पिढ्यांपिढ्यातून वाहत राहो या कामनेसह... छंद मराठी, बंध मराठी!!

--

सायली मोकाटे-जोग

The Future of Coatings

Dhake Industries

GLOBAL SUPPLIER OF COATINGS FOR PLASTICS AND METALS

Dhake Industries offers a wide range of products for Interior and Exterior Automotive Applications as well as other Non-Automotive Applications. Our products are custom formulated to meet the most stringent requirements of any market

- Known in the Industry for Unsurpassed Technical Capabilities
- Leader in Metallic Paint Development for Auto Interiors
- Rapid Product Development with Custom Formulations to Meet Market and Customer Specific Requirements

Various Paint Technologies

- 2K Monocoat
- 2K Base/Clear
- 1K Waterbase
- 2K Waterbase
- One-Coat over TPO/PP
- Adhesion Promoters
- Laser-Etchable Coatings
- Soft-Touch Coatings
- Chrome-Look Coatings
- In-Mold Coatings
- Hydrographics Clearcoats
- Metallic Coating Finishes
- Non-Metallic Coating Finishes
- Much Much More...

Dhake Industries

Please contact us for more information ▸▸▸

Global Headquarters
15169 Northville Rd.
Plymouth, MI 48170
734-420-0101
www.dhakeindustries.com

Wish You All A Very Happy Diwali